# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०११ |
| वर्ष | : | सेहृचाळिसावे |
| अंक | : | दुसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०११**

**गणपत्रिका क्रमांक : १६८**

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

संस्थापक
**गुंडोपंत हरिभक्त**

**वार्षिक ऐच्छिक देणगी**
**किमान ७५ रुपये**

**दीर्घकालीन (१५ वर्ष)**
**सभासद देणगी १००० रु.**
**भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $**

# सद्धर्म
## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष सेहचाळिसावे अंक दुसरा ज्येष्ठ शके १९३३/आषाढ/श्रावण शके १९३३, जुलै २०११

## *संपादकीय*

### पण लक्षात कोण घेतो...?

भारतात घडणाऱ्या सद्य घटनांनी व्यथित होणार नाही असा माणूस सापडणार नाही. वरकरणी या घटना जरी राजकीय, सामाजिक वाटल्या तरी 'नीति' आणि 'मूल्य' या संकल्पनांची समाजातील दिवाळखोरीच त्या दाखवतात. विशेषत: समाजातील तथाकथित साधूसंतांचे पाय जेव्हा मातीचेच असल्याचे स्पष्ट झाले, तेव्हा तर हा विषय आधिक गांभीर्याने घ्यावा लागतो. राजकारण म्हटलं की एक कुटिलता आणि अनेक तडजोडी या गृहीत धरलेल्या असतात. पण अध्यात्म आणि विशेषत: 'संन्यासाश्रम' स्विकारून प्रवचने देणारांना मात्र ही 'सवलत' नसते. संत तुकारामांनी हे अतिशय मोजक्या शब्दांत सांगून ठेवले आहे, ''बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले''. अर्थातच अशी वंदनीय पावले मिळणे हे आजकाल अशक्यच झाले आहे. भारतीय संस्कृती व अध्यात्माचे डांगोरे पिटणाऱ्या या दांभिकांनी, समाजाबरोबरच भारतीय संस्कृती व तिच्या चिन्हांनाही हास्यास्पद बनवून ठेवले आहे.

रामदेव बाबांच्या व अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचाराच्या विरोधातील आंदोलनांना मिळालेला पाठिंबा हा, भ्रष्टाचारामुळे समाज किती त्रस्त झाला आहे, याचे खरे प्रतिबिंब होते. या दोघांनाही मिळालेल्या पाठिंब्याच्या मुळाशी राजकारण व राजकीय पक्षांचा लोकांना आलेला उबगही कारणीभूत आहे. राजकारणी हे फसवणूक करतात, भ्रष्ट आहेत, आपला व्यक्तिगत स्वार्थ आणि कुटुंबाचा फायदा ते करून घेतात; मतांच्या राजकारणासाठी लोकांच्या भावनांशी खेळतात. ई. च्या पार्श्वभूमीवर त्यांची विश्वासार्हता नष्ट झाली आहे. याबाबत एक प्रकारचा राग आणि तिटकारा लोकांच्या मनात होता आणि आहे. रामदेव बाबा हे स्वत:ला योगगुरू म्हणवतात. त्यांच्या योगवर्गाबरोबरच ते सामाजिक दुष्टवृत्तींवरही ते प्रवचने देतात. यामुळेच हा लढा ते लढवू शकतील, नेतृत्व करू शकतील, असा विश्वास लोकांच्या मनात निर्माण झाला होता. मुत्सद्देगिरीचा अभाव आणि नंतर पलायनाचा केलेला केविलवाणा प्रयत्न यातच त्यांच्या ढिसाळ नेतृत्वाचे दर्शन झाले. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांचा हिशेब देतांना त्यांची झालेली त्रेधातिरपीट, त्यामुळे त्यांच्या नैतिक अधिष्ठानाचेही

(पृष्ठ क्र. ३१ वर)

**इकडे लक्ष द्यावे –**

**१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सभासद, वर्षात केव्हाही होता येते.**

२) एप्रिल २००९ पासून 'सद्धर्म'ची देणगी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे. –

अ) वार्षिक : ७५ रुपये ब), दीर्घकालीन (१५ वर्षे) १००० रुपये.

क) भारताबाहेरील सभासदाना : १२५ $.

३) ज्या सभासदांनी २००९ पासूनची वार्षिक आगावू देणगी २५ रुपयेप्रमाणे पाठविली असेल त्यांनी प्रत्येक वर्षाची बाकी देणगी ५० रुपये याप्रमाणे पुढील वर्षाच्या देणगी बरोबर पाठवावी.

४) आजीव सभासद योजना बंद करण्यात आली आहे. जे सभासद ३१ मार्च २००९ पर्यंत 'आजीव' झाले आहेत. त्यांना अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. त्यांनी एप्रिल २००९ पासून वाढवलेली देणगी विचारात घेऊन योग्य ती ऐच्छिक देणगी पाठवावी परदेशस्थ सभासदांनी ७५ $ देणगी पाठवावी, अशी विनंती आहे.

५) देणगी, मनीऑर्डर, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डी.डी.) **'सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट'** या नावाने खालील **पत्त्यावरच** पाठवावी.

**सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,**
द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय,
प्रताप सिनेमासमोर, कोलबाड,
ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१

कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते १ व सायं. ४ ते ७.

ट्रस्टचे बँक खाते ठाणे जनता सहकारी बँक लि. ठाणे भारत सहकारी बँक व भारतीय स्टेट बँक या बँकांमध्ये आहे. मुंबई व ठाणे बाहेरील सभासदांनी वरील बँकां व्यतिरिक्त बँकांवरील धनादेश पाठविल्यास वटणावळ ५० रु. अधिक पाठवावे.

देणगी पाठविताना संपूर्ण नाव, पत्ता व सभासद क्रमांक (सभासद असल्यास) ही माहिती सुवाच्य अक्षरात कळवावी.

**७) खालील ठिकाणी फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी मनीऑर्डर पाठवू नये.**

१) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**
कापडाचे व्यापारी,
१४८, प्रार्थना समाज, गिरगांव,
मुंबई – ४०० ००४.
दूरध्वनी : २३८८ ०६४५
**रविवारी बंद**

२) **श्री. वि. चिं. धोरे**
३/५४, मेघदूत सोसायटी,
लोकमान्य टिळक पथ, टिळक नगर,
ठाणे (पूर्व) – ४०० ६०३.
दूरध्वनी : २५३२ ८०९७

**८) पत्ता बदलला असल्यास ताबडतोब कळवावे.**

९) पाकिटावर सभासद क्रमांकासमोर छापलेल्या त्रोटक अक्षरांचा खुलासा.

१) वा. दे. – वार्षिक देणगीदार सभासद
२) आ. – आजीव सभासद
३) दी. का. – दीर्घकालीन सभासद
४) का.भे. – कायम भेट

'वा. दे.' व 'दी. का.' या अक्षरांसमोर देणगी कधी संपेल ते वर्ष दाखविले आहे.

– संपादक

या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
या त्रैमासिकातील मजकूर संपादकांच्या परवानगीशिवाय कोणीही कुठेही छापू नये.
लेखकांनी या अंकातील त्यांचा लेख इतर ठिकाणी पाठविणे असल्यास, तो सद्धर्माच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे असा उल्लेख करावा.

– संपादक

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| देणगीदाराची नावे व सद्धर्माची प्रकाशने | ३ |
| नाम: स्मरण : प्रभावी साधन | ४ |
| गीतेतील मुख्य शत्रू - काम | ८ |
| नमो देव्यै | १० |
| श्रीमत् शंकराचार्यकृत प्रश्नोत्तर रत्नमाला | १५ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी मराठी म्हणी/वाक्प्रचार (लेख ८वा) | २२ |
| अध्याय २ः सांख्ययोग श्रीमत् भगवद्गीता मराठीत ओवीबद्ध भाषांतर | २४ |
| एक श्लोकी भागवत | २८ |
| श्रीमदाघ शंकराचार्यांची पूजा स्तोत्रे | २९ |


**एप्रिल २०११ ते जून २०११ पर्यंत देणगी देणाऱ्यांची नावे**

**दीर्घकालीन सभासद (१५ वर्षांकरता)**

देणगी १००० रुपये

१) श्री. आ. गो. अभ्यंकर, रत्नागिरी रु. १०००/-
२) श्री. आ. कृ. वेलणकर, ठाणे रु. १०००/-
३) श्री. बी. जी. बापट, अंधेरी (पू) रु. १०००/-
४) श्री. श. भा. बोंद्रे, ठाणे रु. १०००/-
   रु. २२५ /- (मागील बाकी)
५) श्री. सु. र.कोलाकर, अंधेरी रु. १५००/-
   (मागील बाकीसह)

**आजीव सभासदांकडून आलेली ऐच्छिक देणगी**

१) श्री. क. य. टिकेकर, ठाणे, रु. ५००/-
२) श्री. वि. ब. जोशी, ठाणे, रु. ५००/-
३) श्री. गो. त्र्यं. साठे, ठाणे, रु. ५००/-
४) श्री. अ. गं. हिर्लेकर, अमरावती रु. ५००/-
५) श्री. व. द. दारशेतकर , अंधेरी रु. ५००/-
६) श्री. रा. ग. ओक, ठाणे, रु. ५००/-
७) श्री. अमोल मुळे, माहीम रु. ५००/-

वरील सर्व सभासदांचे आम्ही आभारी आहोत.

संपादक

**सद्धर्माची प्रकाशने**

| | | |
|---|---|---|
| १) | सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) | श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) | हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) | श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) | कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) | तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) | पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) | कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) (पृष्ठसंख्या ९६) | रु.१५ |
| ९) | सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) | उपासना (सभासदांसाठी रु. ३०) | रु. ४० |
| ११) | श्रीरामरक्षेतील व्याकरण (सभासदांसाठी रु. ३०/- पोस्टेजसह) | रु.५० |
| १२) | चांगदेव पासष्टी (पोस्टेजसह) | रु. ४० |
| १३) | गंगालहरी (पोस्टेजसह) | रु. २५ |

(पोस्टेज-पोथ्या क्र.१ ते ६ पोस्टेज रु.२/) पुस्तके क्र.७ ते १० पोस्टेज रु.५/ )

**जुने सद्धर्म अंक मिळतील**

सद्धर्मचा पहिला अंक ऑगस्ट १९६५ ला प्रसिद्ध झाला. हा अंक व त्यानंतर ऑक्टोबर १९६५ पासून जानेवारी २०११ पर्यंतचे (एप्रिल १९७४ व जुलै १९७४ चे अंक सोडून) सर्व अंक 'www.Granthalaya.org' या संकेत-स्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुकाना ते download करून मिळू शकतील व त्यांची प्रतही तयार करून घेता येईल, याची नोंद घ्यावी.

एप्रिल १९७४ व जुलै १९७४ चे अंक काही अडचणीमुळे प्रसिद्ध झाले नाहीत.

# नाम: स्मरण : प्रभावी साधन

दिलीप भाटवडेकर

**नाम हा जीव आणि शिव, म्हणजे साधक आणि परमेश्वर या मधला दुवा आहे.** नाम हे साधनाबरोबर साध्यही आहे, जे **सगुणात आरंभ होतं आणि त्याचा शेवट निर्गुणात होतो.** कारण ईश्वर जो मूळ निर्गुण आहे, निराकार आहे, तो सगुणात आला आणि त्याला नाम प्राप्त झाले. साधकाला नाम:स्मरणातून त्याच्याशी अनुसंधान प्राप्त होत व त्यायोगे परमेश्वर प्राप्ती म्हणजेच त्या निर्गुण शक्तीचा अनुभव. नामापासूनच अनुसंधान साधकाच्या मनोवृत्ती परमेश्वराच्या ठायी स्थिर करते, ज्यामुळे साधकातला **'मी'** पूर्णत: लोप पावतो व अव्दैतावस्था प्राप्त होते. म्हणून नाम:स्मरण हा आत्मरूप प्राप्तीचा सोपा आणि संपूर्णपणे उपाधीरहित मार्ग आहे. देहबुद्धीचा नाश करून नाम शरीराचे नव्हे तर मनाचे जीवन, प्राण होते व शेवटी प्राणाबरोबरच नाम बाहेर पडते आपल्या देहातून.

नाम:स्मरणाबद्दल विचार मांडण्याआधी एक गोष्ट सुस्पष्ट करण येथे जरूर वाटते. नाम:स्मरणाचे महत्त्व मांडताना, **सदगुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व** किंवा अपरिहार्यता अमान्य करणे हा उद्देश कदापी नाही. पण ज्याप्रमाणे सगळ्याच बालकांना पितृछत्र जन्मत: मिळतच असे नाही, त्याचप्रमाणे साधकालाही गुरुप्राप्ती सुरवातीपासूनच होईल, असेही नाही. अशा सर्वसधारण भक्तांना नाम:स्मरणाने साधनेचा श्रीगणेश करण्यास हरकत नसावी. नामस्मरणाने साधनेला सुरवात करून आपल्या विधिलिखित गुरूपर्यंतची वाटचाल मात्र आपण सुरू करू शकतो. अध्यात्मात **गुरु उपदेश, गुरूचा अनुग्रह याला अपार महत्त्व आहे,** हे सांगण्याची गरज आहे, असे मला वाटत नाही. **गुरूकृपेशिवाय साधनेतील प्रगती केवळ अशक्यप्राय गोष्ट आहे. मातृप्रेमाप्रमाणे सदगुरुकृपेला पर्याय नाही. हे त्रिकाल सर्वमान्य सत्य आहे.** सद्गुरुकडून मिळालेले नाम / साधना सर्वोत्तम, कारण सद्गुरु सर्व सामर्थ्यानिशी त्याच्या पाठीशी असतो. सद्गुरुकडून मिळालेली साधना ही नेहमीच त्यांच्या देखरेखीखाली आणि भक्ताच्या / साधकाच्या कुवतीनुसार दिली गेलेली असते. दुसरे म्हणजे अशा नाम:स्मरणात **'मी नाम:स्मरण करतो'** असा अहंकार उत्पन्न होण्याला जागाच राहात नाही. कारण ते नाम:स्मरण म्हणने गुरुच्या इच्छेने, गुरुआज्ञेचे पालन म्हणून सुरू होते. म्हणजेच त्याचे कर्तेपण सद्गुरुकडे आहे, साधकाकडे नाही.

आपला श्वासोच्छ्वास चालू आहे. जोपर्यंत आपल्याला स्वत:ची स्मृती आहे, तोवर नाम:स्मरण चालू असावे, ज्यायोगे परमेश्वराशी आपले अनुसंधान कायम राहील. त्याच्यापासून मन आणि बुद्धी दोन्ही दूर जाणार नाहीत. यालाच नाम:स्मरणामुळे मिळणारा एकान्त असे म्हणता येईल. एकान्त म्हणजे एकाचा अन्त, नाम घेणाऱ्याच्या **देहभावाचा अन्त,** त्याच्यातील **अहंकाराची समाप्ती. हीच अव्दैतावस्था, प्रारब्धावर सोडलेला देह आणि परमात्म्याशी एकरूप झालेले मन आणि बुद्धी.** जिथे स्वत्वच उरत नाही, तिथे देहाकडून घडणारे कर्म सकाम असूच शकत नाही. **ज्ञानमार्ग** आणि **कर्ममार्गात** प्रदीर्घ प्रयत्नांनी फार थोड्यांना प्राप्त होणारी ही

अवस्था, भक्तिमार्गात नाम:स्मरणाच्या योगे अगदी सामान्यातील सामान्याला, श्रीमंताला आणि गरीबाला, ज्ञानवंताला आणि अडाण्याला प्राप्त होऊ शकते. **फक्त जरूर असते ती केवळ संपूर्ण समर्पणाची,** ज्याचा 'तो' भुकेला असतो.

**नामजपाला कोणतीही उपाधी नाही.** कोणताही काळ, वेळ, स्थान, स्थिती, इतकेच नाही तर जातकुळी, स्पृश्यास्पृश्यता... कशाचीही आडकाठी याला नाही. फक्त नाम अखंड चालावे हे ध्येय मात्र असायलाच हवे. उदाहरणार्थ, आसनाच्या योग्यतेचा आग्रह धरून जपाला बसल्यावर जर पाठीला रग लागली, तर लक्ष नामापेक्षा शरीराकडे जाईल. म्हणून इतर कोणत्याही गोष्टीचा बाऊ न करता **मनापासून नाम:स्मरण** करावे. मृत्युशैय्येवरील जीवाचे नाम:स्मरणही परमेश्वरापर्यंत पोहोचते, पण **त्यात आर्तता आणि पूर्ण समर्पणभाव मात्र असला पाहिजे. ईश्वराच्या नामाला शरीराचे कोणतेही बंधन नाही. कारण शरीर हे फक्त माध्यम आहे. बंधन असावे ते मनाचे, एकाग्रतेच्या, आर्ततेच्या रूपानं. माणसाला ईश्वराचे सतत स्मरण, अनुसंधानच सहज साधन म्हणजे त्याचे नाम.**

नामाला इष्ट असलेले **एकाग्रचित्त,** ही फार पुढची पायरी आहे. स्वभावत: मनामुळे चित्त हे चंचल आहे, त्याला स्थिर करणे म्हणजे व्रात्य मुलाला शिस्त लावण्यासारखे आहे. कधी गोंजारून, कधी समजावून, तर क्वचित प्रसंगी जबरदस्तीनं. एखादे खट्याळ मूल आपल्याला त्रास देत असताना आपण जाणून बुजून त्याच्याकडे दुर्लक्ष करत राहिलो तर काही काळाने ते मूल आपल्याकडे कोणीही लक्ष देत नाही असे पाहून त्रास देणे सोडून शांत होते. तसेच आहे मनाचे. माणसाची **वृत्ती** ही त्याच्या **मनाचा अविष्कार** आहे. ते स्थिरावल, निर्मळ झाल की वृत्ती ही बदलते. स्थीर आणि शांत मन एकाग्र होऊन नामाशी समरस होते. सर्व सृष्टी नाममय झाल्याची अनुभूती होते. म्हणजेच परमेश्वर सर्व ठिकाणी भरला आहे याची अनुभूती. जीव हा सुद्धा सर्व सृष्टीचा एक अंश म्हणजे त्याच्यातही ईश्वर आहेच. आता **जीवच ईश्वराचा अंश झाल्याची अनुभूती म्हणजेच 'अव्दैतावस्था'.**

हे अंतिम ज्ञान माणसाला कर्मयोगाने अथवा ज्ञानयोगानही प्राप्त होते, पण या मार्गात उपासनेला उपाधी असंख्य आहेत. शारीरिक क्लेश आहेत. योगाभ्यास आहे. पण भक्तिमार्गात नाम:स्मरणाला यापैकी काहीही उपाधी नाहीत. अपेक्षित आहे ते फक्त संपूर्ण समर्पण, **केवळ ईश्वरासाठी ईश्वराच आकंठ प्रेम,** जसे पतिव्रता पत्नीच पतीसाठी असते. हे शक्य आहे केवळ आपल्या अहंकाराचा पूर्ण विग्रह झाल्यावर, आपल्या हातून घडणाऱ्या सर्व कर्माचे कर्तेपण मनापासून परमेश्वराकडे दिल्यावर. अशी अवस्था म्हणजे **परमेश्वराचा केवळ परमेश्वरासाठीच हव्यास** असणे, **अहंकार अथवा इच्छापूर्तीसाठी नाही.** देह प्रारब्धावर सोडलेला आणि मन पूर्णत: ईश्वरमय झाले की जी पूर्णावस्था प्राप्त होते, त्या अवस्थेत चाललेले नाम:स्मरण म्हणजे 'अजपाचा जप' 'अनन्त' आहे.

विषयाच्या आवडीमुळे आपले मन त्याच्याकडे ओढ घेत आणि विषय भोगात एकाग्र होते ज्यावेळी परमेश्वराची तीव्रतेने आवड निर्माण होईल, त्याचवेळी मन आणि चित्तवृत्ती त्याच्याकडे आकृष्ट होऊन आपोआप एकाग्र

होतील. हीच अव्दैतामुळे प्राप्त झालेली 'समाधी' अवस्था. या अवस्थेत जीवाला कशाचेही भान रहात नाही. ह्या अवस्थेच्या प्राप्तीसाठी, माणसाने भगवंत हा एकमेव दाता, त्राता आहे असे मानून कल्पनेपलीकडे असणारा तो जगदीश सगुण करावा आणि त्याच्याठायी आपले चित्त स्थिर करण्याचा प्रयत्न करावा. नाम:स्मरणात आपण जे नाव घेत असतो त्या आराध्य दैवताचे सूक्ष्मरूपाने मानस दर्शन आपल्याला सतत होत असतेच, परंतु भरकटलेल्या मन:स्थितींत अथवा अस्वस्थचित्त असताना नाम:स्मरण करताना असा अनुभव आपल्याला येत नाही, कारण चित्त एकाग्र नसते. पण प्रयत्नान्ती, क्षणार्धासाठी आपल्या मिटलेल्या डोळ्यासमोर आपल्या दैवताची प्रतिमा तरळून जाते. हा क्षणच आपल्यासाठी उर्जा देणारा असतो, त्या क्षणाला मन एकाग्र होते. हळूहळू याची पुन:पुनरावृत्ती वाढीला लागते आणि मनाला आणि वृत्तीला स्थिरता प्राप्त होते. थोडक्यात, मन एकाग्र करणारी ती आराध्याची प्रतिमा ही केन्द्रबिन्दू असते. आपल्या आराध्य दैवताच्या ठायी आपले मन जेव्हा पूर्णपणे समर्पित होते, त्यावेळी आपण त्या शक्तीकडून पूर्णपणे आश्वस्त झाल्यामुळे, निर्भय आणि म्हणून आनन्दी होतो. अशा स्थितीत आपण कुठेही अगर केव्हाही आपले डोळे मिटताक्षणी, इतकेच नव्हे तर उघड्या डोळ्यांनी आपल्या दैवताच दर्शन घेऊ शकतो. असा अनेक साधकांचा अनुभव आहे. पण हा प्रतिपादनाचा भाग नसून अनुभूतीचा भाग आहे, ज्याप्रमाणे वाऱ्याची प्रतिमा दाखवता येत नाही, पण त्याच्या नुसत्या सुखद हळुवार स्पर्शाचा अनुभव मात्र अंधालाही घेता येतो. नामात असताना होणारे दर्शन आपल्या मनाने तयार केलेल्या आपल्या आराध्य दैवताचे असते. याचाच अर्थ त्या अरुपाला आपल्या मनाने नामाच्या सामर्थ्याने दिलेले रूप असते. जर नाम:स्मरणात याचा अनुभव होत नसेल तर असे निश्चित समजावे की आपणच 'त्याला' जीवाच्या आकांताने साद घालण्यात कमी पडतो आहोत. आईच अपत्य, तिच मूल, त्या मुलाने अगदी कळवळून आईला हाक मारली आणि ती माता त्याच्याकडे धावून गेली नाही, असे कालत्रयीही होणे शक्य आहे का? नाम:स्मरणही माणसाचे मन, चित्तवृत्ती स्वच्छ करून निर्मळ बनविण्याची प्रणालीच विधात्यानं आपल्याला सुपूर्द केली आहे, जी पूर्णपणे स्वयंचलीत आहे आपल काम तिला अहर्निशपणे कार्यान्वित ठेवणे इतकेच आहे. आपण स्वत:ला इमानेइतबारे एकदा तिच्या ताब्यात दिले की आपल्या मोक्षप्राप्तीपर्यंत ती प्रणाली आपले काम अव्याहतपणे करतच असते. या तिच्या कार्यात कच्चामाल निकृष्ट दर्जाचा असला तरी, त्याला योग्य दर्जा प्राप्त करून देण्याची क्षमता या 'नाम' नावाच्या प्रणालीत आहे. थोड्या श्रमात पुष्कळ साधून देणारे नामासारखे दुसरे साधनच नाही. नाम:स्मरण सुरू केल्यावर, विकल्प निर्माण होऊ लागणे म्हणजे या प्रणालीने आपले कार्य योग्य दिशेने चालू केले आहे याचेच द्योतक आहे. विकल्पाना आपली गच्छंती आता अटळ आहे असे वाटून त्यांची चळवळ चालू होणे हेच नामसाफल्य प्रारंभाचे दर्शक आहे. ज्याप्रमाणे माणसाला रोग प्रतिबंधक लस टोचली की त्याला थोडासा ज्वर येतो, ताप येणे हेच रोगप्रतिबंधक लस आपल काम योग्य प्रकारे करत असल्याचे प्रमाण आहे असे मानले जाते. म्हणूनच नामाची लस मनाला टोचली की ते विकल्प निर्माण करायला सुरुवात करते. साधकासाठी हा क्षणच महत्त्वाचा आहे. मनातील विकल्पामुळे मनाची एकाग्रता

होत नाही, म्हणून नाम:स्मरण सोडता कामा नये, ते नेटान चालू ठेवले पाहिजे. हीच आत्मज्ञान प्रक्रियेची सुरुवात असते.

आराध्याचे नाम म्हणजे स्थूलातून सूक्ष्माच्याही पलीकडे जाणे. नाम म्हणजे आपल्या मनानं त्या तेजसाची अंशरूपानं चितारलेली मानसप्रतिमा, नामसाधनेत कालान्तराने त्या मनातल्या प्रतिमेचे रूपान्तर एका तेजसबिन्दूत तेज आहे, प्रखरता आहे, निरामय शांतताही आहे, कधी ती धगधगत्या निखाऱ्याप्रमाणे लालबुंद दिसते, तर कधी सूर्यप्रकाशाप्रमाणे शुभ्र आणि तेजस्वी दिसते, तर मनाला, वृत्तीना ऊर्जा पुरवत असतो, आणि समृद्ध करत असतो. याप्रकारे नाम साधकाला स्थूलातून सूक्ष्माच्याही पलीकडे असलेल्या तेजसाच्या अंशाकडे नेते. तेथेच होते त्या निर्गुण निराकाराची पाहिली ओळख.

नाम हे निष्काम कर्माप्रमाणेच सत्कर्माचे जनक आहे. एखाद्यानं नाम:स्मरणात राहून कुकर्म करायचे ठरवले तरी, तो त्यात यशस्वी होणे शक्य नाही. कारण पाण्याला आग लावता येत नाही. नामात मनाला मिळणारा आनंद, शांती आणि यायोगे मिळणारे समाधान इतके प्रचंड असते की अशा नम:स्थितीत माणूस दुष्कर्म करणे संभवत नाही. अर्थात हातून सत्कर्मच घडू शकते, आणि अशा सत्कर्मापासून आपल्याला आनंद, समाधानच मिळते, अशाप्रकारे होत राहिलेले मनावरचे नामाचे संस्कार, मनातला मळ काढून टाकत असतात, ज्याची परिणती कालांतराने संपूर्ण निर्मळ मनात होते, भगवंताच्या अनुसंधानासाठी जरूर असलेली मनाची एकाग्रता मन निर्मळ आणि शांत असल्याशिवाय मिळणे अशक्य आहे. इतर साधनांत या एकाग्रतेसाठी प्रचंड मेहनत आणि पराकाष्ठेचे प्रयत्न याची जरूर लागते. उदाहरणार्थ, योगसाधनेतही प्रचंड मेहनत आहे. इतकेच नाही तर योगसाधनेत अनेक उपाधीही आहेत, पण भक्तीमार्गात, नाम:स्मरणात हे, तुलनात्मक विचार केल्यास, सुलभ आहे. याची अनुभुती प्रत्येक माणसान स्वत:च घेणे सुयोग्य आहे, कारण अध्यात्म हा कथनाचा नाहीतर अनुभूतीचाच विषय आहे. यातील साधनेत आत्मानुभव हे एकमेव फलित असते. नामसाधना सर्वस्वी वैयक्तिक असते, फक्त तिचा अविष्कार मात्र लैकिक होतो.

सर्व श्रीसदगुरुचरणार्पणम् अस्तु.

**दिलीप भाटवडेकर**
२१५, राजा राम मोहन मार्ग,
१ ला मजला, सर भालचंद्र बिल्डिंग,
गिरगांव, मुंबई – ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५८८७५

●●●

**शंकराचार्यकृत 'आत्मषटक'स्तोत्र**

एप्रिल २०११ च्या सद्धर्म त्रैमासिकांत पान २४ वर वरील स्तोत्र छापले आहे. त्या स्तोत्राच्या शेवटी पान २६ वर डॉ. (सौ.) वैशाली जयन्त दाबके यांच्या ऐवजी डॉ. श्री. म. भातखंडे यांचे नाव चुकून छापले आहे. याबद्दल क्षमस्व. डॉ. (सौ.) वैशाली दाबके यांचा पत्ता खाली दिला आहे – बी ३०२, मित्तलपार्क को. ऑ., हा. सो. लि., रघुनाथ नगर, ठाणे (प) ४०० ६०४
भ्रमणध्वनी – ९८२१४९२७५३
दू. ध्व. – २५८२६६५८

– संपादक

## गीतेतील मुख्य शत्रू - काम

**श्री. ज. गो. मराठे**

गीतेची लौकिक सुरवात अर्जुनाच्या प्रदीर्घ व्याख्यानाने होते. त्याला परंपरेने ठाऊक असलेली कारणे सांगून तो धनुष्य टाकून स्वस्थ बसला तरी तो अस्वस्थ होता. भगवान काहीच बोलत नव्हते ते घोड्यांचे काचरे खेचून स्वस्थ होते. अर्जुनाचे व्याख्यान पुढे चालूच होते. शेवटी अगदी अगतीक होऊन तो शिष्य भावाने भगवंताला शरण गेला. किचिंत त्याच्या मूर्खपणावर हसत त्यानी त्याला आत्म्याचे अमरत्व सांगून स्थितप्रज्ञतेचा अत्यंत भारी डोस पाजला. वास्तविक या उपदेशाने अर्जुन मोह टाकून उठणे अपेक्षित होते. पण तसें घडले नाही. भगवंताच्या बोलण्यात ज्ञान श्रेष्ठ की कर्म श्रेष्ठ याचा नीट उलगडा झाला नाही, असे समजून मी युद्धाचे थोर कर्म कां करू असा प्रश्न विचारला. तेव्हा देहधाऱ्याला क्षणभर सुद्धा कर्म न करतां जगतां येत. ते सहज आहे. ते प्रकृती कडून होत असते. ते कर्तृत्वाला फळाशेचा त्याग करून करावे. तसे करण्यांत कसले पाप नाही असे सांगितले. अगदी स्पष्ट असे सांगणे असूनही अर्जुन तिरूत्तर झाला नाही. त्याच्या बुद्धीत काही शिस्त नव्हते म्हणून त्याने 'अथ' पासून पुन्हा गीता सुरू केली. त्या अर्जुनाच्या प्रश्नापासून भगवगंतानी जे सांगीतले ती कामगीता त्या गीतेचे स्वरुप समजून घेणे हा लेखाचा मुख्य विषय पुढच्या बॉलिंगसाठी हा थोडा 'पॉज'

**अर्जुन उवाच–**

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः।

अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः।। ३-३६।।

अर्जुनाची ही प्रश्नगीता तशी तुमची आमची रोजची गीता आहे. या प्रश्नाचे उत्तर मिळवून अर्जुनाने मानवजातीवर फार मोठा उपकार केला आहे. गीतेच्या पहिल्याच श्लोकांत ''योद्धुकामान्'' युद्धाची इच्छा करणारे असा कौरवपक्षाचा उल्लेख आला आहे. मग पाण्डव काय योद्धकामान् नव्हते? ते सगळं कामामुळेच मरायला आले होते. म्हणून इथे गीतेची सुरवातच कामरूप आहे. फक्त एक भगवानच असे होते की जे निष्काम होते. ते स्थितप्रज्ञ होते. ते मिळवण्या गमवण्यासाठी आले नव्हते. म्हणून युद्धांत सुद्धा 'रथी' नव्हते साधे. सारथी होते. असो.

अर्जुनाचा थोडक्यात प्रश्न असा की स्वत: पाप (वाईट काम) करण्याची इच्छा नसूनही, त्याच्याकडून ते, जणू मानगुटीवर बसून ते कोण करून घेतो?

या प्रश्नाच्या उत्तरांत 'काम एष क्रोध एष' हा काम हा क्रोध अशी दोन नावे घेतली. पण इथें ती दोन असून क्रियापद द्विवचनी नाही. म्हणून काम व क्रोध ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू. ते दोघे रजोगुण – रजोगुण समुद्भव आहेत. म्हणजे रजोगुण हा त्यांचा बाप. प्रकृतीच्या सत्व, रज, तम या तीन गुणांत हा मध्यस्थ आहे. त्याचे जणू दोन हात सत्व व तमाच्या हातात आहेत. निष्क्रीय असलेल्या सत्व व तम या दोघांना जणु तो वेठीला धरून गरगरा फिरवित आहे. थोडक्यांत 'काम' हाच या संपूर्ण सृष्टीचा मूलाधार आहे. अशी या कामाची जन्मकुळी सांगून भगवान त्याचे कार्य वर्णन करतात. त्यासाठी या ठिकाणी 'महाशन' व 'महापाप्मा' असे दोन अत्यंत अर्थपूर्ण शब्द वापरले आहेत. महाखादाड, चंगळवादी, कायम

उपाशी, अधाशी, ते खाण्यासाठी वाट्टेल ते करणारा याला पापपुण्य काहीच विचारायचे नाही हा सत्यनारायणाचा प्रसाद व शेण एकाच घासात एकाच चविने चघळेल. यांच्या समोर कुणाचे काही चालत नाही. हा कामरूप आहे हा कोणतेही रूप घेतो. हा ज्ञानमार्गावरील लुटारू आहे, याना ज्ञानदेव विषय दरीचे मांग असे म्हणतात आपल सगळं साहित्य याच्या रसाने थबथबत आहे. बरे याचे चरित्र सांगणेच कठीण आहे. तो कुठे नाही हे सांगणेच कठीण. अर्जुनाला प्रश्न पडला की असा हा कुठे रहात असेल. त्याला काही अधिष्ठान असायला हवेच ना? त्यावर भगवान म्हणाले.

इन्द्रियाणि मनो बुद्धिः अस्याधिष्ठान मुच्यते।

एतैर्विमोह्यत्येष ज्ञानमावृत्य देहिनम्।। ३-४०।।

इन्द्रिये, मन बुद्धी या तीन यांच्या रहाण्याचा जागा. यांच्या आश्रयाने हा सर्वप्राण्यांच्या ज्ञानाला झाकून टाकतो. ते धुंद होतात आणि मग तो जे जे सांगेल ते गुपचुप करतात. हे सगळे मौनानेच होते. या कानाचे त्या कानाला कळत नाही असा हा अमोध शत्रू 'दुरासद' आहे म्हणजे जिंकण्यास फार कठीण आहे. तरी पण तुला यालाच मारून पुरुषार्थ सिद्ध करावा लागेल. त्याच्या चेहऱ्यावर प्रश्न उमटतो 'कसा जिंकायचा काम'?

अर्जुना तुला सर्वप्रथम इन्द्रियाना वश करून घ्यावे लागेल मगच तुला त्याचा खरा पत्ता मिळेल. त्याची वाट आधिकाधिक बिकट आहे. असे म्हणून त्यानी चार टप्पे सांगितले ते असे.

इन्द्रिये बलवान आहेत. त्यापेक्षा मन बलवान आहे; त्याहून बुद्धी बलवती आहे. आणि त्या बुद्धीच्याही पार पलिकडे 'तो' (सः) आहे. यासाठी याच गहन वाटेने जाउन, त्याला ओळखावा लागेल. आणि त्याची 'ओळख' म्हणजेच त्याचे मरण किंवा पराभव। अर्जुना हा कामच इथे मोठा शत्रू आहे. त्यालाच तू ठार मार. हे समोर सगळेच कामरूप आहेत. ते त्याच्याच निमित्ताने आले आहेत.

गीतेच्या तिसऱ्या अध्यायाच्या ४३ व्या श्लोकात कामाचे रुप जन्मस्थान निवासस्थान व कार्य सांगून त्याला मारण्याचा उपाय सांगितला व ही कामगीता संपली. तरी सुद्धा संपूर्ण गीतेत हा कामक्रिडा करतोच आहे. पण ते सगळे तुकडे तुकडे आहेत. ते गीता अभ्यासकाला सहज कळतील.

इथे ४२ व्या श्लोकांत 'बुद्धेः परतस्तु सः' असें म्हटले तो 'सः' कोण? काम की आत्मा असा एक विकल्प आहेः त्याचा समन्वय करूनच या लेखाचा समारोप करू. 'सः' हे दर्शक सर्वनाम आहे. ते नाम नाही. त्यांतील 'सः' हा उभय वाचक असावा म्हणजे बुद्धीच्या पलिकडे 'आत्मा' आहे. म्हणजे काम पुन्हा काम बुद्धी व आत्मा यांच्या मधला दुवा आहे! तो दुवा तुटत नाही तो पर्यत काम दुर्बल होणार नाही. इथेच खरी जगद्‌गुरू भगवान गोपाल कृष्णाची कृपा हवी. त्यासाठी त्यालाच शरण जावे लागेल. तूर्त इतकेच पुरे.

**श्री. ज. गो. मराठे**
३०४, ॐ सिद्धी अपार्टमेन्ट,
पद्मणनगर, आगाशी-४०१३०१
दूरध्वनी : २५०-२५८८६९५

●●●

डॉ. श्री. म. भातखंडे

'वर्षाऋतूंत भरपूर वर्षाव करून नीलकृष्ण मेघ दश दिशा अंधारून टाकल्यानंतर आता शांत झाले आहेत. त्यांच्या गर्जना आता ऐकू येत नाहीत. विजांचा कडकडाट आता होत नाही. आकाश पांढरे स्वच्छ झाले आहे. नद्या, जलाशय आणि पुष्करण्या यांतील गढूळ पाणी आता निर्मळ झाले आहे. प्रफुल्लित कमलांचा शीतल सुगंध घेऊन वायू मंद मंद वहात आहे. भृंगे मधुपान करण्यांत गर्क झाले आहेत. पर्वताच्या शिखरावरील सप्तपर्ण बन्धुजीव इत्यादि वृक्ष फुलांनी बहरले आहे, त्यामुळे सर्वच वनप्रदेश उजळला आहे. भातशेते आता पिकली आहेत, निसर्गाच्या सौदर्याने नटलेली भूदेवी नयनमनोहर दिसते आहे. आकाश निरभ्र झाल्यामुळे शरदाचे चांदणे तिचे सौदर्य अधिकच खुलवते आहे. ही प्रतिभा आहे आदिकवि वाल्मीकीची, रामायणाच्या किष्किंधाकाण्डामध्ये त्यांनी शरदाचे वर्णन केले आहे. सर्वत्र आनंदीआनंद आणि प्रसन्नता घेऊन येणाऱ्या शरदऋतुत सुरुवातीलाच देवीच्या मांगल्याची भर पडते आणि सर्वत्र आनंदाला उधाण येते.

**घटस्थापना :**

देवीच्या विशेष उपासनेची सुरुवात होते घटस्थापनेपासून. आश्विन शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी प्रात:काली अभ्यंग-स्नान करून गणपतिपूजन इत्यादि करून घटस्थापना करतात. घट ठेवायच्या जागेवर चांगली मऊ माती घालून त्यावर गहू वगैरे नऊ प्रकारची धान्ये पेरतात. अशा त्या तयार केलेल्या वेदीवर पाण्याने भरलेल्या घटाची (कलशाची) स्थापना करतात. त्यात आंबेहळद, चंपक इत्यादि औषधी, दुर्वा, सप्तमृत्तिका इत्यादि घालून त्यावर पूर्ण पात्र ठेवतात. अशा त्या कलशावर आपल्या कुलदेवतेची प्रतिमा ठेवून पूजा करतात. पुरुषसूक्त आणि श्रीसूक्त यांच्या ऋचांनी देवीला आवाहन करून व षोडशोपचारे पूजा करून प्रार्थना करण्यात येते. घटाजवळ नऊ दिवस नंदादीप तेवत ठेवतात.

**विविध पद्धती :**

भारतामध्ये सर्वत्र नवरात्रोत्सव साजरा करण्यात येतो. देवी नवरात्रोत्सव करण्याचा अधिकार अखिल मानव जातीस आहे. आपापल्या कुलाचाराप्रमाणे उत्सवाची पद्धत भिन्न भिन्न आहे. मात्र देवीपूजन हे सर्व ठिकाणी महत्त्वाचे असून, आपल्या आचारानुसार देवीवर फुलांच्या माळा बांधणे, उपवास एकभुक्त, नक्त (फक्त रात्री एकदा भोजन करणे) सुवासिनीभोजन, कुमारीभोजन, पूजन, होमहवन, बलिसमर्पण, देवीभागवतश्रवण इत्यादि धर्मकृत्ये करण्यात येतात. काही ठिकाणी वेदांचे पारयण करण्याची पद्धत आहे. आश्विन शुद्ध पंचमीला उपांगललिता देवीचे व्रत करतात. याच काळांत पंचमीनंतर विशिष्ट नक्षत्रावर सरस्वती आवाहन, पूजन व विसर्जन करतात. नवरात्रांतील महालक्ष्मीपूजनही प्रसिद्ध आहे. नवरात्रोत्थापनेच्या दिवशी देवीची यथाविधी पूजा करून विसर्जन झाल्यावर घटस्थापनेच्या दिवशी पेरलेल्या धान्याची छोटीशी रोपे प्रसाद म्हणून शिरी धारण करण्याचा प्रघात आहे.

मार्कण्डेय पुराणांत असलेल्या देवीमहात्म्यांत असे म्हटले आहे की 'संकटकाळी अनन्यभावाने जे मला शरण येतात त्यांच्यासाठी मी प्रगट होऊन त्यांना दु:खमुक्त

करीन मी सदैव प्रसन्न असावे म्हणून आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून नऊ दिवस घटपूजा, होमहवन इत्यादिकांनी माझे पूजन करावे. अशाप्रकारे नवरात्र पाळण्याची पद्धत प्रचारात आली असावी.

**कृषिमहोत्सव :**

अश्विन महिन्यांत नवीन पिके येतात आणि त्यामुळे संपन्नता असते. हे नवीन धान्य देवीला अर्पण करावे व नंतर त्याचा उपभोग घ्यावा अशी प्रथा असावी. आता घटस्थापनेच्या दिवशी प्रतीकात्मक नऊ धान्ये पेरतात व अशाप्रकारे कृषिमहोत्सव साजरा करण्यात येतो. अश्विन शुद्ध पौणिमेला नवान्न प्राशन/ करण्याची चाल आहे काही नवनिर्मितीच्या बाबतीत नऊ या संख्येला महत्व आहे असे दिसते. १) नवमास, माणसाला गर्भात रहावे लागते. २) मूळ संख्या नऊ पर्यंतच आहे पुढे शून्य देऊन ती वाढविण्यात आली. ३) देवीचे व इतर देवाचे नवरात्र पाळतात येथे नऊ ही संख्या आलीच. ४) आपल्या देहात नवद्वारे आहेत. (गीता ५.१३) आणि गंमत म्हणून उदाहरण द्यायचे झाल्यास नऊ या अंकाचा पाढा. या पाढ्यांतील प्रत्येक संख्येची बेरीज नऊच होते. उदाहरणार्थ - नऊ एके नऊ नऊ दुणे अठरा १८ = १ + ८ = ९ नऊ त्रिक सत्तावीस २७ = २ + ७ = ९ इत्यादि.

**देवीमहोत्सव आणि विविध कथा :**

काही असले तरी नवरात्र देवीच्या उपासनेसाठीच प्रसिद्ध आहे. आपण नेहमी जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी। सुरवर ईश्वरवरदे तारक संजीवनी। अशी देवीची आरती करतो. महिषासुराचा तिने वध केला म्हणून तिला महिषासुरमर्दिनी म्हणतात. या महिषासुराची जन्म कथा त्रिपुरारहस्यांत वर्णन केली आहे.

एकदा इंद्र अप्सरांबरोबर कीडा करण्याकरता विंध्य पर्वतावर गेला. तेथे त्याने गौतमऋषीची सून पाहिली. अप्सरांपेक्षा दिसायला ती कमी होती. इंद्राने तिला चेष्टेने म्हटले 'अग तू म्हशीसारखी का दिसतेस?' त्या साध्वीला ती चेष्टा सहन झाली नाही. ती म्हणाली तुझीच पत्नी शची भूतलावर महिषी (म्हैस) होईल व तुझ्या शत्रूला जन्म देईल. तत्काळ इन्द्रपत्नी शची पृथ्वीवर महिषी झाली. कैटभासुरापासून तिने महिषासुराला जन्म दिला. नंतर ती परत देवलोकात गेली.

पुढे वयात आल्यावर महिषासुराने तपश्चर्या करून प्रचंड सामर्थ्य मिळविले. राक्षसी प्रवृत्तीप्रमाणे त्याने ते सामर्थ्य देवांना त्रास देण्यासाठी वापरायला सुरुवात केली सर्व देव शंकराकडे गेले. रागाने तप्त झालेल्या शंकराच्या नेत्रातून तेज बाहेर पडले व त्या तेजापासून देवीचे मुख निर्माण झाले. यमाच्या तेजाने तिच्या मस्तकावरील केस उत्पन्न झाले. विष्णूच्या तेजापासून देवीचे वाहू बनले. चंद्राच्या तेजाने तिची वक्षस्थले झाली. इंद्राच्या तेजापासून कंबर, वरूणाच्या तेजाने मांड्या व पोटऱ्या, ब्रह्मदेवाच्या तेजापासून दोन्ही पाय तर अग्नीच्या तेजाने तिचे डोळे निर्माण झाले. अशाप्रकारे सर्व देवांच्या तेजापासून देवी उत्पन्न झाली. सर्व देवांनी आपापली आयुधेहि तिला अर्पण केली. अशा या देवीने शुंभ, निशुंभ, रक्तबीज वगैरे राक्षसांबरोबर नऊ दिवस युद्ध केले आणि त्याना मारले विजयादशमीला तिने महिषासुरांचा वध केला. म्हणून तिला महिषासुरमथिनी किंवा महिषासुरमर्दिनी म्हणतात.

दुर्गा देवीची आणि महिषासुराची लढाई म्हैसूरमध्येझाली. म्हणून त्या प्राताला महिष. शब्दावरून म्हैसूर नाव पडले. म्हैसूर या नावात म्हैस म्हणजे महिषी शब्द आहे. त्या बाजूला महिषी शब्दाचा अभिषिक्त राणी असा ही अर्थ आहे.

वराहपुराण, देवीभागवत, मार्कण्डेय पुराण इत्यादि पुराणांमध्ये देवीच्या उत्पत्तीच्या विविध कथा आल्या आहेत. तिचे पराक्रम, तिचे सामर्थ्य, तिची कृपा, तिचे भजनपूजन इत्यादीचे सविस्तर वर्णन तेथे आहे. सर्व देवांच्या तेजांपासून देवी उत्पन्न झाल्यामुळे ती सामर्थ्यसंपन्न आहे. देवीच्या पूजेवाचून देवांची पूजा पूर्ण होत नाही. साधारणत: सर्व धार्मिक कार्यक्रमात आरतीच्यावेळी देवीची आरती म्हटली जाते. देवीला पंचायतनामध्ये स्थान आहे. पंचायतन म्हणजे गणेश, विष्णु, शंकर, दुर्गादेवी आणि सूर्य हे पाच देव होत. पंच म्हणजे पाच, आयतन म्हणजे म्हणजे घर. परमेश्वराच्या शक्तीची ही विशेष स्थाने आहेत. पंचायतनाची पूजा केल्यामुळे त्या त्या देवांची शक्ती प्राप्त होते. पंचायतन पूजेमध्ये आपल्या इष्टदेवतेला मध्यभागी ठेवून बाजूला इतर देव मांडण्याची पद्धत आहे.

**देवीची विविध नावे :**

परमेश्वर एकच असूनसुद्धा त्याला विविध नावाने ज्ञानी माणसे संबोधतात - एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति- त्याचप्रमाणे देवीचीही अनेक कथा आहेत. असे असले तरी गोंधळून जाण्याचे काही कारण नाही. देवीतत्व हे एकच आहे. देवीच्या अनेकविध पराक्रमाच्या संदर्भात तिला निरनिराळी नावे पडली. महिषासुराला मारले म्हणून महिषासुरमर्दिनी, चंड-मुंड या राक्षसांना मारले म्हणून चामुंडा, वगैरे. तसेच ज्याला ज्याप्रमाणे देवीची अनुभूती आली त्याप्रमाणे त्याने देवीची नावे प्रसृत केली. शिवा, अंबिका, ब्राह्मी माहेश्वरी, गौरी, भवानी, अपर्णा, सावित्री, देवमाता, महादेवी, कल्याणी, महाकाली, महालक्ष्मी महासरस्वती इत्यादि, देवीने प्रसंगानुरुप नऊ अवतार घेतले. त्या नऊ अवतारांची तिची नावे पुढीलप्रमाणे आहेत. १) शैलपुत्री २) ब्रह्मचारिणी ३) चंद्रघंटा ४) कूष्मांडा ५) स्कंदमाता ६) कात्यायनी ७) कालरात्री ८) महागौरी ९) सिद्धिदात्री.

**सप्तशती :**

सप्तशतीशिवाय देवीबद्दल काही लिहिणे किंवा बोलणे व्यर्थ होय. नवरात्रामध्ये देवीच्या उपासनेत सप्तशतीला फार महत्त्व आहे. यावेळी घरोघरी सप्तशतीचा पाठ वाचतात. सप्तशती म्हणजे मार्कण्डेय-पुराणातील देवीमहात्म्य होय. या देवीमहात्म्याचे १३ अध्याय असून एकूण श्लोक संख्या ७०० आहे. सातशे या संख्येवरून सप्तशती हे नाव पडले. सप्तशती फार सुरस आहे. त्या सप्तशतीमधील कथा भाग थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

फार पूर्वी सुरथ नावाचा राजा पृथ्वीतलावर राज्य करीत होता. तो एकदा युद्धात पराभूत झाला. नंतर त्याच्या मंत्र्यांनी त्याला लुटले आणि त्याचे सैन्य पण नष्ट केले. अत्यंत दु:खी झालेला तो राजा शिकारीच्या निमित्ताने बाहेर पडून अरण्यात गेला. तेथे तो योगवशात् 'मेधा' नावाच्या ऋषीच्या आश्रमात गेला. तेथे तो काही काळ राहिला. एके दिवशी समाधि नावाच्या व्यापारी तेथे आला. त्याला त्याच्या बायकामुलांनी संपत्तीच्या लोभाने बाहेर काढले होते. दु:खी असलेले सुरथ आणि समाधि हे दोघेही त्या ऋषीजवळ गेले. त्यांना वंदन करून दोघांनी आपपली हकीकत

सांगितली. त्यांचे दु:ख शांत होण्यासाठी मेधा ऋषींनी त्यांना देवीविषयी उपदेश केला.

देवी नित्य आणि निरंतर आहे. देवकार्यासाठी ती अवतार घेते. सत्त्व, रजस् आणि तमस् या तिन्ही गुणांना उत्पन्न करणारी ती मूलप्रकृती आहे. ती सौम्य आणि सुंदर आहे. ती सर्व विश्वाची स्वामिनी आहे. मेधा ऋषींनी पुढे यांना देवीचे महात्म्य सांगितले.

फार पूर्वी दैत्यांचा सेनापती महिषासुर आणि देवांचा राजा इंद्र यांच्यामध्ये शंभर वर्षेपर्यंत युद्ध झाले. देव युद्धात हरले. त्यांनी शंकर आणि विष्णु यांच्याकडे धाव घेतली. महिषासुराचा नाश करण्यासाठी देवीने अवतार घेतला ती सर्व देवांचे तेज घेऊन निर्माण झाली. महिषासुराचा सेनानी चिक्षुर, उदग्र नावाचा महादैत्य, महाहनु इत्यादि अनेकांनी देवीबरोबर लढाई केली; आपल्या गणांसह हजारो हातांनी युद्ध केले व त्यांचा पाडाव केला. त्यांची शस्त्रास्त्रे तोडून टाकली. प्रचंड प्रमाणात रक्तपात झाला. आपले सैन्य नष्ट होत असलेले पाहून महिषासुराने रेड्याचे रुप घेतले व देवीच्या अंगावर धावून गेला आणि त्याने देवीच्या गणांना त्रास द्यायला सुरुवात केली. देवीने, त्याला पाशाने बांधले, तेव्हा त्याने रेड्याचे रूप टाकून सिंहाचे रूप धारण केले. जगदंबेने त्याचे मस्तक तोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्याने तलवार घेतलेल्या पुरुषाचे रूप घेतले. त्याला मारणार तेवढ्यात त्याने हत्तीचे रूप घेतले. देवीच्या सिंहाला तो खेचणार इतक्यात देवीनं त्याची सोंड कापली. परत महिषासुराने रेड्याचे रूप घेतले. देवीने त्याच्या अंगावर शूलाने प्रहार केला, तेवढ्यात त्याने रेड्याचे रूप टाकून राक्षसाचे रूप घेतले. यावेळी देवीने अतिशय त्वरेने तलवारीनें त्याचे शीर धडावेगळे केले आणि एका प्रबळ झालेल्या दैत्याचा नाश केला. देवांनी दुर्गेची स्तुती केली. त्यांना अभय देऊन ती अंतर्धान पावली.

काही काळाने शुंभ आणि निशुंभ हे दैत्य प्रबल झाले. त्यांनी तर साक्षात देवीशी विवाह करण्याची अभिलाषा धरली. त्यांचे सेवक चंड व मुंड व सेनापती धूम्रलोचन यांच्याशी व त्यांच्या सैन्याशी देवीची घनघोर लढाई झाली. तिने उग्र रूप धारण करून सर्व दैत्यांचा संहार केला. या लढाईच्या वेळी देवांच्या निरनिराळ्या शक्ती त्यांच्या देहापासून निघून देवीच्या सहाय्यास आल्या. नंतर शुंभ आणि निशुंभ यांचा देवीने नाश केला व परत एकदा सर्व देवांस अभय देऊन ती गुप्त झाली.

अशाप्रकारे मेधा ऋषींनी राजा सुरथ आणि समाधि नावाच्या व्यापाऱ्याला देवीचे महात्म्य सांगितले. देवी भगवती नित्य असूनही पुन्हा पुन्हा अवतार घेऊन दुष्टांचा संहार करते व जगाचे पालन करते. तिची प्रार्थना केल्यास ती ज्ञान विज्ञान देते. मेधाऋषींनी त्यांना देवीची आराधना करण्यास सांगितली. पुढे दोघांनी नदीकाठी तपश्चर्या केली. आपला आहार कमी करून अत्यंत निष्ठेने देवीची उपासना केली. देवी प्रसन्न झाल्यावर सुरथ राजाने राज्याची इच्छा केली. देवीने त्याची इच्छा पुरी केली. समाधी व्यापाऱ्याने मात्र मोक्षज्ञानाची इच्छा केली. देवीने त्याला मोक्षज्ञान दिले.

मार्कण्डेय पुराणातील सप्तशतीचा पाठ भाविक लोक नवरात्रात फार भक्तीने करतात. पाठाच्या प्रारंभी संकल्प करून चण्डीकवच, अर्गला स्तोत्र, कीलकस्तोस्त्र व रात्रिसूक्त म्हणतात. तसेच ॐ ऐम् ऱ्हीम क्लीम् चामुण्डायै विच्चे या मंत्राचा जप करतात. नंतर पाठ वाचतात. शेवटी देवीसूक्त म्हणतात. तद्नंतर प्राधानिक रहस्य, वैकृतिक रहस्य आणि मूर्तिरहस्य वाचतात. शेवटी देवीच्या प्रार्थनेने सप्तशतीचा पाठ पूर्ण होतो.

**शीघ्र फलदायी उपासना**

फार पूर्वीपासून भारतात देवीची उपासना चालू आहे. देवीची उपासना लवकर फलदायी होते. म्हणजे देवी इतर देवांपेक्षा लवकर प्रसन्न होते. देवीची उपासना करणाऱ्यांचा सतत उत्कर्ष होतो. त्यांची धर्माकडे प्रवृत्ती रहाते. त्यांची मनोवांछिते पूर्ण होतात. जो प्रतिदिनी तिची उपासना करतो त्याची सर्व पीडा दूर होते. ज्या घरात तिची उपासना होते ते घर ती कधीही सोडत नाही. नवरात्रातील सात्विक पूजेने ती विशेष प्रसन्न होते.

शरण येणाऱ्यांचे कल्याण करणाऱ्या, समृद्धी आणि सिद्धीरुपी देवीला नमस्कार असो. अत्यंत शांत तसेच अत्यंत भयंकर असे दोन्ही प्रकारचे रूप धारण करणाऱ्या हे देवि तुला नमस्कार असो. जगाचा आधार असणाऱ्या, सर्व प्राणीमात्रांच्या ठायी चैतन्यरूपाने रहाणाऱ्या व दयाळू अशा हे देवि तुला नमस्कार असो. सर्वांचे सतत मंगल करणाऱ्या हे महादेवि तुला नमस्कार असो.

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः ।

नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम् ।

**डॉ. श्री. म. भातखंडे**
विजय निवास, कुंटे वाडी,
भास्कर कॉलनी, महात्मा गांधी मार्ग,
नौपाडा, ठाणे-४०० ६०२.
दूरध्वनी : २५४००८११

●●●

**श्री गणपती अथर्वशीर्षांतील व्याकरण**
(मराठी अर्थासह)

सद्धर्म प्रकाशनातर्फे वरील पुस्तक ऑगस्ट २०११ मध्ये प्रकाशित होणार आहे. १० ऑगस्ट २०११ पूर्वी २५ रुपये पाठविणाऱ्या सभासदाना हे पुस्तक बुक पोस्टाने पाठविण्यात येईल. पैसे सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर मनी ऑर्डर व धनादेशनेच पाठवावे. कार्यालयांत ही ते स्वीकारले जातील. मुंबई व ठाणे जिल्हाच्या बाहेरील सभासदानी पैसे ड्राफ्टनेच पाठवावे. पुस्तक ट्रस्टच्या कार्यालयांतही मिळेल.

पुस्तकाचे लेखक - श्री. दि. दा. औटी

पुस्तकाचे देणगीमूल्य ३० रुपये

- संपादक

मागील लेखावरून पुढे

**५० कस्य क्रिया हि सफला य:पुनर् आचारवान् शिष्टः ।**
**क:शिष्टः यो वेद प्रमाणवान् को हतः क्रियाभ्रष्टाः ।।**

कुणाचे कार्य सफल होते? जो आचरणशील व विद्वान आहे. विद्वान कोण? वेद प्रामाण्य मानणारा नष्ट कोण होतो? क्रियाभ्रष्ट नष्ट होतो.

कोणतेही कर्म यशस्वी होण्यासाठी त्या कामा विषयी संपूर्ण माहिती मिळवावी व ते काम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम करावे. म्हणजे इथे ज्ञान व कर्म याची आवश्यकता आहे. केवळ अनुकरणाने कोणतेही कर्म करू नये त्यात सफलता प्राप्त होतेच असे निश्चित सांगता येत नाही. वेद प्रमाण मानणाऱ्याला आचार्य शिष्ट असे म्हणतात वेद म्हणजे ज्ञान म्हणजे ज्ञाना बद्दल आदर करणारा तो शिष्ट वा ज्ञानी ऐहिक वा पारलौकिक सफलता व्हावी असे वाटणाऱ्याला ज्ञान व कृती याची नितांत आवश्यकता आहे. क्रियाभ्रष्टाला क्रिया न करणाऱ्याला काहीच जीवनात जमत नाही. तो दोनही क्षेत्रात अपयशी ठरतो म्हणून क्रिया भ्रष्टाला तो नष्ट होतो असे आचार्य म्हणतात.

**५१ को धन्यः संन्यासी को मान्यः पण्डितः साधुः ।**

**कः सेव्यः यो दाता योऽ र्थितृप्तिं आतनुते ।।**

मान्य कोण विद्वान व साधु. मान्य कोण संन्यासी सेवा करण्यास योग्य कोण? दाता दाता कोण – जो याचकांची तृप्ति करतो.

संन्यासी हा श्रेष्ठ असे आचार्य म्हणतात. धन्य हा शब्द भाग्यवान, पुण्यवान या अर्थी आला आहे. संन्यासी हा सर्वस्वाचा त्याग करणारा व तपस्वी असे अर्थ संभवतात. दोन्ही गुण श्रेष्ठ प्रतीचे आहेत. सर्वस्वत्याग करणे वा अंखड तपाचरण करणे या दोन्ही गोष्टीना आपल्या जीवनात स्थान देणे इतके सोपे नाही. हे पुण्यवंतानाच शक्य होते. म्हणून आचार्य म्हणतात कौपीनवंतः खलु भाग्यवंतः । विश्वात मान्यता दोन व्यक्तीना प्राप्त होते विद्वान माणसाला व सज्जनाला. 'विद्वान् सर्वत्र पूज्यते' हे सुभाषित प्रसिद्ध आहे. विद्वान हा पढत पंडित नसून विवेक बुद्धि असलेला व त्याप्रमाणे व्यवहार करणारा. सज्जन सदा सदाचरणी व सतत संतुष्ट वृत्तीचा असतो समाज अशा माणसाला मानते. सेवा जो योग्यवेळी मदत करून जीवनात उभे करतो अशा दात्याची करावी कारण दाता हा सहृदयतेने याचकांनचे ईप्सित पूर्ण करतो. यामुळे समाजात समाधान पसरते.

**५२ किं भाग्यं देहवतां आरोग्यं कः फली कृषिकृत् ।**

**कस्य न पापं जपतः कः पूर्णो यः प्रजावान् स्यात्।।**

शरीरधारण करणाऱ्याचे भाग्य कोणते? आरोग्य. कुणाला फळ मिळते – शेती करणाऱ्याला. पाप कुणाला लागत नाही. – नाम जपणाऱ्याला. पूर्ण कोण? जो प्रजायुक्त आहे.

आरोग्य हे भाग्यच आहे. कोणतेही कर्म करण्यास आरोग्य उत्तम पाहिजे. म्हणजेच तो उत्साहाने काम करतो. हे भाग्य ऐहिक व पारमार्थिक दृष्टिनेही उपयुक्त, दोन्ही ठिकाणची सफलता आरोग्यवरच अवलंबून. शेताची मशागत करतो व सतत शेतीतील कामे करतो अशा कष्ट घेणाऱ्या शेतकऱ्यालाच धान्याचा लाभ होतो. भगवंताचे सतत नाम स्मरण करतो त्याचे मनोबळ वाढते तो कोणतीही संकटे ओढवली तरी डगमगत नाही व अनाचारी बनत नाही. इतके नाम जपाचे सामर्थ्य असल्याने तो पापाचरण करूच शकत नाही. असे मानले जाते की संतति विच्छेद न करणारा मानव पूर्ण आयुष्य समाधानाने घालवतो.

**५३ किं दुष्करं नराणाम् यन्मनसो निग्रहः सततम्।**

**को ब्रह्मचर्यवान् स्यात् यश्च अस्खलितऊर्ध्व रेतस्कः।।**

माणसाला काय अवघड वाटते – सतत मनाचा निग्रहः ब्रह्मचर्य कशाला म्हणतात – वीर्य स्खलन न होता सतत ऊर्ध्व रेत करू शकतो त्याला ब्रह्मचर्य पालन म्हणतात.

मनोजय प्राप्त करणे कठीण आहे. अर्जुन कृष्णाला सांगतो–कृष्णा मन चंचल आहे. त्याचा निग्रह करणे हे वाऱ्याच्या निग्रह इतके कठीण आहे. मात्र मनावर ताबा नसला तर, अधर्माचरणाची शक्यता वाढते. मनोनिग्रह ऐहिक व पारमार्थिक जीवन दृष्टया अत्यावश्यक. गीता सांगते अभ्यास व वैराग्य याने मनोनिग्रह शक्य होते. हे कष्टाचे काम आहे. जो ऊर्ध्व रेत आहे, ज्याचे वीर्य स्खलन होत नाही. तो ब्रह्मचर्याने युक्त असतो. मनातील वासना बलिष्ठ झाल्यास वीर्यस्खलन होते हे देखील कष्ट साध्यच आहे.

**५४ का च परदेवता उक्ता चित्शक्तिः को जगत् हर्ता।**

**सूर्यः सर्वेषां को जीवन हेतुः स पर्जन्यः।।**

श्रेष्ठ देवता कुणाला म्हटले जाते – चैतन्य शक्तीलाच. जगाच्या पोषण कर्ता कोण? सूर्य. सर्वांच्याच जीवनाचा आधार कोण? पर्जन्य.

चित् शक्ती सर्वगत व सर्वव्यापक आहे. चित् शक्ती निर्गुण निरकार हीच शक्ती आवश्यक. त्यावेळी विग्रह धारण करते व काही गुणांचा आविष्कार करते. चित् शक्ती सत् चित् आनंदरूप आहे. इतर देवताना मर्यादा असतात. कारण ठरविक हेतूने त्यांचे अवतरण झालेले असते. म्हणून चित् शक्ती हीच श्रेष्ठ पदी आहे.

सूर्यच सर्व सृष्टीचे पोषण करतो. वेदात सूर्याला जगताचा आत्मा असे म्हटले आहे. सूर्य आत्मा जगतः तस्थुतश्च। ज्ञान आरोग्य सूर्यापासून – आरोग्यं भास्कारात् इच्छेत्। सर्व जनतेच्या जीवनाचा आधार पर्ज्यन्य हा आहे. पर्जन्यामुळेच अन्नधान्याची पैदास होते. पाण्याला जीवन म्हटले आहे. हे पाणी पर्जन्यामुळे प्राप्त होते. सूर्य व पर्जन्य यांचा निकटचा संबंध आहे. आदित्यात् जायते वृष्टि, ततो अन्नं ततः प्रजाः।

**५५ कः शूरः यो भीतत्राता त्राता च कः स गुरुः।**

**कोहि जगद् गुरुः उक्ता शंभुः ज्ञानं कुतः शिवादेव।**

शूरकोण?भयभीतांचे रक्षण करतो. असा रक्षिता कोण ? गुरु जगद्गुरु कुणाला म्हणतात? शिवाला. ज्ञान कुणाकडून होते ? शिवाकडून.

भयभीत आहेत त्यांचे रक्षण करतो त्याला शूर म्हणतात. क्षतात् त्रायते इतिक्षात्रः। असा त्राता ऐहिक क्षेत्रात शूर व पारमार्थिक क्षेत्रात गुरु. गुरु हा भव भयापासून मानवाना तारतो. त्याच्या उपदेशाने मार्गदर्शनाने साधक अगर शिष्य हा भवसागर ओलांडून जातो. सर्व जगताचा गुरु कोण – भगवान शिव. हा आदिनाथ हा गुरु स्थानी आहे शंकरापासून अनेक विद्या या भूलोकी प्रसारित झाल्या. याच्या डमरूतून शद्व निर्माण झाले. योग विद्या याच्या पासून प्रवर्तित झाली. गुरु म्हणजे ज्ञान देणारा. सर्व जगाला वडील धारा असणारा व ज्ञान देणारा भगवान शंकरच आहे. आपण कृष्णाला जगद् गुरु म्हणतो? शिवही जगद् गुरु आहे. ज्ञान हे शंकराकडून प्रसारित झाले आहे ही भारतीयांची धारणा आहे.

**५६ मुक्तिं लभेत कस्मात् मुकुन्द भक्तेः मुकुन्दः कः।**

**यः तारयेत् अविद्यां काच अविद्या यत् आत्मनः अस्फूर्तिः।।**

मुक्ती कशाने मिळेल? मुकुन्द भक्तीने. मुकुन्द कोण ? जो अविद्येतून तारतो. अविद्या कोणती ? आत्म्याची स्फूर्ति रहितता.

आचार्य, मुकुन्द भक्तीने मोक्ष प्राप्त करता येते असे म्हणतात. भज गोविन्दं हे स्तोत्र त्यांचे प्रसिद्धच आहे. भगवंताच्या भक्तीने ज्ञान प्राप्त होते व अज्ञानाचा नाश होतो. अज्ञानालाच तत्वज्ञानात अविद्या असे म्हणतात. मात्र हे अज्ञान स्व स्वरूपाविषयीचे, व्यावहारिक नव्हे. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. जीव व शिव यांच्याशी गाठ घालून देणारे ज्ञान. ही गाठ घालून देणारा मुकुन्द आहे. तोच या अज्ञानापासून आपली सुटका करतो. ही अविद्या म्हणजे आत्मस्फुरणाचा अभाव होय. वास्तविक जीव हा ईश स्वरूपाचा आहे. अविद्येमुळे त्याची जाण येत नाही. त्यासाठी मुकुन्द भक्ती आवश्यक.

**५७ कस्य न शोको यः स्यात् अक्रोधः किं सुखं तृष्टिः।**

**को राजा रंजनकृत् कश्च श्वाा नीच सेवकः यः स्यात्।।**

कुणाला दुःख होत नाही? जो रागावत नसतो. सुख कोणाला? संतुष्टाला. राजा कोण ? प्रजेचे रंजन करतो तो. कुत्रा कोण ? श्वान वृत्ती. जो नीच माणसाचा सेवक असेल तो.

ज्याला राग येत नाही तो दुःखी होत नाही. माणसाला इच्छा होते इच्छापूर्तीने माणूस सुखावतो. तसे न झाल्यास तो क्रुद्ध होतो. आतल्या आत चडफडतो त्यामुळे तो दुःखी होतो. एखादी गोष्ट मनासारखी न झाल्यास पुनरपि प्रयत्न करणे हा मार्ग योग्य म्हणजे दुःख होत नाही. सुख म्हणजे तृप्ती व समाधान होय. प्रजेचे हित पाहातो तो खरा राजा. राजा प्रकृति रंजनात्। इथे कुत्रा या शद्वाने श्वा वृत्ती अभिप्रेत आहे. सेवाही श्ववृत्तीच आहे. धन्याच्या मर्जी प्रमाणे वागावे लागते. त्याला प्रसन्न करण्यासाठी लांगूल चालन करावे लागते. नीच माणासाची दासवृत्ती पत्करणे म्हणजे पोटाची खळगी भरण्यासाठी लाचारी पत्करणे होय. इथे श्वानवृत्ती शिवाय दुसरा पर्याय नाही.

**५८ को मायी परमेशः कः इन्द्रजालायते प्रपंचोऽयम्।**

**कः स्वप्न निभः जाग्रद् व्यवहारः सत्यपि च किं ब्रह्म।।**

मायी कोण? परमेश्वर. इंद्रजालासारखे काय? हा प्रपंच. स्वप्नासारखे काय? जागृतातील हा व्यवहार. सत्य कोणत? ब्रह्म.

वेदान्तानुसार परमेश्वरालाच मायेचा स्वामी असे म्हटले जाते. माया ही ईश्वरी शक्ति मानली जाते. – मायां तु प्रकृतिं विद्यात्। मायिनं तु महेश्वरम्। श्वेताश्वतर उप प्रपंच म्हणजे संसार, हा इंद्रजाला सारखा आहे. इंद्रजाल म्हणजे जादूटोणा, जादूचा खेळ. फसवा असतो. प्रपंच ही फसवाच. जन्मभर मानव प्रपंच्याच्या ओझ्याखाली दबून जातो व त्याला स्वरूपाची ओळख करून घेण्यास फुरसतच मिळत नाही. जागृतीतील व्यवहार हा देखील स्वप्नवत् असतो. मात्र आपणाला ते खरे वाटतात. आचार्य म्हणतात. स्वप्नातील दृश्ये क्षण भंगूर ठरतात मात्र स्वप्न वेळी ती खरीच वाटतात. जागृतीतील व्यवहारही तसेच आहेत. हे विचार पूर्वक ध्यानी घेतले पाहिजे. मग सत्य काय? ब्रह्म हे त्याचे उत्तर आहे. सत् म्हणजे चिरकाल असणारे. सत् हे अस्तित्व मात्र असते तेच अंतिम सत्य होय. त्याचा अभाव अगर नाश कधी होत नाही असे अविनाशी अनंत व अपरिवर्तनीय जे तत्व आहे त्यालाच ब्रह्म म्हणतात.

**५९ किं. मिथ्या यत् विद्या नाश्यं तुच्छं तु शशविषाणा दि।**

**का च अनिर्वचनीया माया किं कल्पितं द्वैतं।।**

मिथ्या काय? जे विद्येने नष्ट होते. शशाचे शिंग इत्यादि तुच्छ आहे. अनिर्वचनीय काय? माया. काल्पनिक काय? द्वैत.

मिथ्या हे ज्ञानाने नष्ट होते. इथे आत्मस्वरूपा विषयीचे अज्ञान गृहीत धरले आहे. ज्यावेळी हे सारे ब्रह्मच आहे असे ज्ञान होते त्यानंतर जगदाभास विषयीचे अज्ञान नाहीसे होते. जे ज्ञानाने नाहीसे होते त्यालाच मिथ्या म्हणतात. मिथ्या म्हणजे खोटे हा अर्थ योग्य नाही. जे कायम स्वरूपात टिकत नाही ते मिथ्या. हा अर्थ योग्य आहे. माया – आहे अगर नाही याबद्दल निश्चय करता येत नाही म्हणून मायेला अनिर्वचनीय म्हणण्यात येते. काल्पनिक काय? याचे उत्तर द्वैत असे आचार्य म्हणतात. इथे मी या संदभीत अनेक विकल्प निर्माण होतात मी व्यतिरिक्त जे आहे ते अन्य काही आहे त्यालाच तू या नावाने संबोधले जाते. म्हणजे मी च्या विचाराने तू हे कल्पिले जाते. वास्तविक हे सारे काही आहे ते मीच आहे. अहं ब्रह्मास्मि ही जाणीव निर्माण झाल्यास तू हा विकल्पच संभवत नाही. म्हणजे द्वैत बुद्धी ही काल्पनिक आहे असेच सिद्ध होते.

**६० किं पारमार्थिके स्यात् अद्वैतंच अज्ञता कुतोऽनादिः।**

**वपुश्च पोषकं किं प्रारब्धं च अन्नदायि किं च आयुः।।**

पारमार्थिक काय असेल? अद्वैत अज्ञान कुठून – अनादि शरीराला पोषक काय? प्रारब्ध अन्नदायी काय? आयुष्य.

अद्वैत हेच पारमार्थिक असे आचार्य ठासून सांगतात. म्हणून सतत याचा विचार लोकातून व्यक्त होत असतो अज्ञान अनादि आहे त्याची उत्पत्ती सांगता येत नाही ज्ञानाने त्याचा नाश होतो म्हणूनच ते अनंत नाही. कर्म विपाकाला अनुसरून प्रारब्ध, क्रियमाण संचित असे कर्म भेद आहेत. पूर्व जन्मीचे कर्म पुढील जन्मी फलोन्मुख होते. याला प्रारब्ध म्हणतात त्यानुसार जीवाला जन्म प्राप्त होत असतो. म्हणजे ते शरीर पोषक ठरते. अन्नामुळे जीव जगतो म्हणजे आयुष्य अन्नावर अवलंबून.

**६१ को ब्राह्मणैः उपास्यः गायत्री अर्क अग्नि गोचरः शंभुः।**

**गायत्र्यां आदित्ये च अग्नौ शंभौच किंनु तत्त्वम्।।**

ब्राह्मणाना काय उपास्य? गायत्री, सूर्य व अग्नि या स्वरूपात गोचर असणाऱ्या शंभूची. गायत्री आदित्य अग्नि व शंभू यात काय महत्त्वाचे आहे ? तत्त्व.

ब्राह्मणाची उपास्य दैवते कोणती असावीत? गायत्री, सूर्य व अग्नि या तीन स्वरूपात गोचर होणाऱ्या म्हणजे इंद्रियाना जाणवणाऱ्या शंभू तत्त्वाची उपासना करावी. या साऱ्या देवता तेजोरूप, सगुण साकार आहेत. ब्राह्मणाने तेजाची उपासना करावी असे आचार्य म्हणतात. तेज शक्ती व बुद्धीचे प्रतीक आहे. सामर्थ्य व विद्वता यासाठी उपासना आवश्यक. या देवता शंभूच्या सगुण रूपातल्या तेजो देवता आहेत. म्हणून त्या ब्रह्मरूपच आहेत.

**६२ प्रत्यक्ष देवता का माता पूज्यः गुरुश्च कस्तातः**

**कः सर्व देवतात्मा विद्या कर्मान्वितो विप्रः।।**

साकार देवता कोण? माता पूजनीय कोण? गुरु, पिता, सर्व देंवताचा आत्मा कोण? विद्या व कर्म युक्त वैदिक.

माता ही प्रत्यक्ष दिसणारी देवता असल्याने आचार्य मातेला उद्देशून म्हणतात न मातुः परं दैवतम्। संन्याशाला कशाचे ही बंधन नाही मात्र माता ही सर्व श्रेष्ठ असल्याने तिचे बंधन संन्याशालाही आहे. म्हणून संन्यास घेतले असतानाही मातेचे ऊर्ध्व संस्कार केले. पूजनीय वंदनीय कोण? इथे गुरु व पिता हे दोघेही वंदनीय आहेत. माता व पिता हे जन्म दाते असतात. गुरु व्यक्तिला आकार आणतो. माता पिता व गुरु यांचे आपल्यावर महान उपकार आहेत. हे तीघेही देवता स्वरूपाच्या आहेत. मातृदेवोभव। पितृदेवोभव। आचार्य देवोभव। ही आपली संस्कृति आहे. सर्व देवतांचा आत्मा अर्थारत विद्या म्हणजे ज्ञान. व कर्मप्रवणविप्र. इथे विद्या ही आत्मविद्या अभिप्रेत आहे. वेदाभ्यास करून आपल्या आचरणाने इतराना मार्ग दर्शन करतो तो अर्थातच वंदनीयच आहे. या दोनही गोष्टीमुळे मोक्ष साधना सुलभ होते.

**६३ कश्च कुलक्षय हेतुः संतापः सज्जनेषुयोऽकारि।**

**केषां अमोघ वचनं येच पुनः सत्यमौनशम शीलः।।**

कुलाच्या नाशाचे कारण – सज्जनाना त्रास

देऊन त्यांचा रोष ओढवून घेतो. कुणाचे बोल व्यर्थ होत नाहीत – जे सत्य, मौन, शम आदि गुणानी युक्त आहेत.

सज्जनाना उगाच त्रास देऊ नये. तो अध:पतनाला कारणी भूत होतो. यादवांच्या कुलाचा नाश ऋषीला त्रास दिल्यामुळेच झाला. ही घटना ध्यानात आणल्यास यांना त्रास देण्याने कुलक्षय कसा होतो हे कळले. जे सत्य वचनी आहेत व निरर्थक बडबड न करता मौनधारण करतात जे मनोनिग्रही आहेत. त्यांचे बोल सहसा फोल ठरत नाहीत. याची पुराणांत अनेक उदाहरणे पाहता येतील.

**६४ किंन जन्म विषयसङ्गः किं उत्तरं जन्म पुत्रःस्यात्।**

**को परिहार्यः मृत्युः कुत्र पदं विन्यसेत्च दक् पूते।।**

जन्म कोणता – विषयसंग पुढिल जन्म कोणता? पुत्र अपरिहार्य काय? मृत्यु पाऊल कुठे टाकावे – डोळ्यांनी पाहिल्यावर पाऊल टाकावे.

विषयाच्या सेवनाने मानवाचा जन्म होतो. पुत्रजन्म हा मानवाचा पुढील जन्म, आत्मा वै पुत्र नामासि। टाळता न येणारी गोष्ट – मृत्यु जातस्य हि ध्रुवो मृत्युः। म्हणून गीता सांगते तस्मात् अपरिहार्यर्थे न त्वं शोचितुं अर्हसि। अपरिहार्य गोष्टी बद्दल शोक करू नये. पुढचे पाऊल टाकताना नीट अवलोकन करावे मगच पाऊल टाकावे दृष्टीपूतं न्यसेत् पादम्। असे सुभाषित प्रसिद्ध आहे. भारतीय संस्कृतीत बारिक सारिक गोष्टींचाही विचार केलेला आहे.

**६५ पात्रं किं अन्नदाने क्षुदितं कोऽर्च्योहि भगवत् अवतारः।**

**कश्च भगवान् महेशः शंकर नारायण आत्मैका।।**

अन्न दानाला खरा पात्र कोण? भुकेलेला. अर्चनीय कोण? भगवंताचा अवतार. भगवान कोण? शंकर नारायण यांचा ऐक्य असणारा महेश.

अन्नदानाला योग्य हा भुकेलेलाच असू शकतो. पोट भरलेल्याला अन्नाचा उपयोग नाही. योग्य व्यक्तीला योग्य वस्तू देणे म्हणजेच सत्पात्री दान होय. यालच सात्विक दान असेही म्हणतात. भुकेलेल्याला अन्न व तहानलेल्याना पाणी देणे हे सात्विक कर्म आहे. पूजनीय जे अनेक भगवंताचे अवतार आहेत व त्या त्या गुणांचे प्रभावानी ज्या ठिकाणी आविष्करण झाले आहे. ते सारे अर्चनीय आहे. भगवंत कोणाला म्हणाव? जिथे ऐक्य आहे. शिव व विष्णु यांचे ऐक्य असलेला महान् ईश – महेश – परब्रह्म तोच परमात्मा होय.

**६६ फलं अपि भगवत् भक्तेः किं तल्लोक स्वरूप साक्षत्वम्।**

**मोक्षश्च को हि अविद्यास्तमयः कः सर्ववेद भू रथचोम्।।**

भगवद् भक्तीचे फळ काय? त्याच्या लोकाच्या व त्याच्या स्वरूपाचा साक्षात्कार. मोक्ष कोणता? अविद्येचा नाश. सर्व वेदांचे उत्पत्ति स्थान कोणते? ॐकार

भगवत् भक्तीने मुक्ती मिळते स्वरूप साक्षात् व तल्लोक साक्षात दोनही प्राप्त होतात.

मोक्ष म्हणजे अज्ञानाचा नाश. ॐकारातून सर्व सृष्टी निर्माण झाली ॐकार हे ब्रह्मच आहे. ॐइति एकाक्षरं ब्रह्म।

**६७ इत्येषा कण्ठस्था प्रश्नोत्तर रत्नमालिका येषाम्।**

**ते मुक्ता भरणाइव विमलाश्च आभान्ति सत्समाजेषु।।**

अशी ही प्रश्नोत्तर मालिका ज्याच्या कंठात असेल तो शुद्ध मोत्याच्या अलंकारानी युक्त अशा हारानी सज्जनांच्या समाजात उठून दिसतो.

श्रीमत् आद्य शंकराचार्यकृत प्रश्नोत्तर रत्नमाला समाप्ता।

इतिशम्।


**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०


•••

**नामाचे महत्त्व**

नामातच नामाचे प्रेम असते. ताकात लोणी असतेच. ते वर दिसत नाही. ताक घुसळ्यावर ते जसे वर येते तसे भगवंताचे नाम घेतले की प्रेम आपोआपच वर येते.

मनात घोलविण्यासाठी

संकलक
- श्री. वि. ह. गुर्जर

**निवेदन**

सद्धर्म त्रैमासिकाच्या सर्व सभासदानी जरूर पडल्यास संपर्कासाठी आपला दूरभाष क्रमांक एस.टी.डी. कोडसह, (असल्यास भ्रमणध्वनी क्रमांक), आपल्या सभासद क्रमांकासह पोष्ट कार्डावर सौ. मालती नवाथे ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर वा श्री. प्रकाश दीक्षित, ३०२, दुर्गा कोहौसो. कोलबाड, ठाणे ४०० ६०१. या पत्त्यावर कळवावे. श्री. दीक्षित यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९८१९६९३१९५ आहे. एस.एम.एस. पाठवून ही संपर्क साधू शकता व माहिती देऊ शकता. तसेच आपण सौ. रेखा दीक्षित यांच्याशी ०२२-२५४७२००५ या दूरध्वनी क्रमांकवर ही संपर्क साधू शकता. या सर्वाचा उपयोग संपर्क व संवाद वाढण्यासाठी नक्की होईल असा विश्वास वाटतो.

एप्रिल २०११ च्या अंकात पान १७ वर दिलेले सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टचा भारतीय स्टेट बँकेतील बचत खाते क्रमांक व बँकेचा कोड क्रमांक बदलले आहेत. ते असे आहेत -

ट्रस्टचा खाते क्र. १०८८४९३०९५५
बँकेचा कोड क्र. ९०५६

या खात्यांत आवश्यक आहे.

- संपादक

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी मराठी म्हणी / वाक्प्रचार (लेख ८वा)

दि. दा. औटी

**खल: करोति दुर्वृत्तं नूनं फलति साधुषु ।**[१७१]

कथा कोणाची व्यथा कोणाला

श्लोकाची दुसरी ओळ आहे 'दशाननो आहरत् सीतां बन्धनं स्यान्महोदधे: ।। रावणाने सीतेचे हरण केले बन्धन मात्र समुद्राला भोगायला लागले (सेतुमुळे )

**ख्यात: सर्वरसानां हि लवणो रस उत्तम: ।**[१७२]

सर्व रसांमध्ये लवणरस (मीठ) श्रेष्ठ आहे. श्लोकाची दुसरी ओळ आहे 'गृहीतं च विना तेन, व्यञ्जनं गोमयायते। अर्थ – मिठाशिवाय अन्न बेचव लागते.

**अनर्घ्यमपिमाणिक्यं हेमाश्रयमपेक्षते ।**[१७३]

मौल्यवान मोत्यालाही सोन्याचा आश्रय घ्यावाच लागतो. सुभाषितकार म्हणतात पंडिताला, स्त्रीला आणि वेलीला आश्रया शिवाय शोभा नाही.

**गुणा गुणज्ञेषु गुणा भवन्ति ।** [१७४]

गुणी लोकच गुणांचे महत्त्व जाणतात.

ऊर्दू म्हण – गधा क्या जाने जाफरानकी कदर? जाफरान – केशर मराठी म्हण – गाढवाला गुळांची चव काय?

**नो दया मांसभोजिन: ।** [१७५]

मांसाहार करणाऱ्याच्या मनात दया कोठून? सुभाषितकार म्हणतात – घरबशाला विद्या कोठून मिळणार? द्रव्याची हाव सुटलेल्या माणसाला सत्याची चाड कशी असेल? आणि बाईलवेड्याला पवित्र काय कळणार?

**तस्माद् घृतं च वह्निं च नैकत्र स्थापयेद् बुध: ।**[१७६]

स्त्री तुपाच्यां घड्याप्रमाणे आहे व पुरुष तापलेला विस्तव आहे म्हणून शहाण्याने दोन्ही एकत्र ठेवू नयेत.

**नासमीक्ष्य परं स्थानं पूर्वमायतनं त्यजेत् ।** [१७७]

दुसऱ्या स्थानाची पक्की खाषी झाल्याखेरीज पहिले स्थान सोडू नये.

**क्षीणोऽपि न त्यजति शीलगुणान् कुलीन: ।**[१७८]

सज्जन कितीही दुर्बळ झाला तरी चारित्र्य सोडीत नाही.

**आत्मार्थे को न जीवति ?**[१७९]

स्वत:साठी कोण जगत नाही? ज्याच्या जगण्यामुळे प्रिय मित्र, नातेवाईक जगतात त्याचे जीवन सफल ठरते. स्वत:साठी तर सगळेच जगतात. त्यात विशेष ते काय?

**अर्थो हि लोके पुरुषस्य बन्धु: ।**[१८०]

लोक जगात फक्त पैशालाच ओळखतात. दरिद्रता धीरतया विराजते ।१८१

दारिद्र्य धैर्यानेच शोभून दिसते.

**कुवस्त्रता शुभ्रतया विराजते।**[१८२]

सामान्य कपडे स्वच्छतेमुळे शोभून दिसतात.

**कदन्नता चोष्णतया विराजते।**[१८३]

शिळे अन्न गरम केल्यावर चांगले लागते.

**कुरुपता शीलतया विराजते।**[१८४]

कुरूप मनुष्य चारित्र्यामुळे शोभून दिसतो.

**बहुरत्ना वसुंधरा।** [१८५]

ही पृथ्वी अनेक रत्नांनी नटलेली आहे. हे संपूर्ण सुभाषितच वाचनीय आहे.

**पदे पदे च रत्नानि योजने रसकूपिका।**
**भाग्यहीना न पश्यन्ति बहुरत्ना वसुंधरा।।**

हाच सुभाषिताचा अंश असलेले आणखी एक सुभाषित

**दाने तपसि शौर्ये वा विज्ञाने विनये नये।**
**विस्मयो न हि कर्तव्यो बहुरत्ना वसुंधरा।।**

दाना बद्दल हरिश्चन्द्र, कर्ण असे शिरोमणी झाले. तपश्चर्या करून वाल्याचा वाल्मीकी झाला. बाजी प्रभूने शौर्याने पावनखिंड अजरामर केली. अनेक वैज्ञानिकांनी विज्ञान क्षेत्रात प्रगती करून आपल्याला थक्क केले आहे. विनयाबद्दल लक्ष्मण सर्वज्ञात आहे. आणि न्याय (नय) देतांना रामशास्त्री प्रभुणे यांनी राघोबादादांना सुद्धा देहान्त प्रायश्चित देतांना न्यायाचा तराजू विचलित होऊ दिला नाही. अशी ही वसुंधरा बहुरत्ना आहे यात आश्चर्य ते काय?

**दारिद्र्यमतिदु:सहम् ।**[१८६]

दारिद्र्य आणि मरण या दोन्हीमध्ये मरण फार बरे कारण मरण अल्पक्लेशी असते पण दारिद्र्याचे क्लेश त्याहूनही भयंकर असतात.

**उष्णो दहति चाङ्गार: शीत:कृष्णायते करम्।**[१८७]

सुभाषितकार म्हणतात दुर्जनांबरोबर मैत्री किंवा प्रेम करू नये. त्यांनी पेटलेल्या विस्तवाचे उदाहरणे दिले आहे. पेटलेला असतांना तो चटके देतो व विझल्यावर सुद्धा हात काळे करतो

क्रमश:

**श्री. दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३ विठ्ठल मंदिराजवळ,
मु. पो. मुद्रेखुर्द, ता. कर्जत
जि. रायगड ४१० २०१.
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

**आचरण शुद्ध कसे असावे**

लोकमान्य टिळक एका ग्रंथात लिहितात ‘‘मी स्वत: एक पामर मानव आहे. तरी मी सांगू शकतो की, ३० वर्षे मी संयमीत व संशुद्ध मार्गाने माझी जीवन यात्रा चालवीत आहे. कदाचित् त्याचेच फळ म्हणून मला दिव्य प्रकाश दिसतो व सूक्ष्म ध्वनी ऐकू येतो. महात्मा गांधी सुद्धा असेच म्हणत होते की मी सत्याचा उपासक आहे म्हणूनच जनतेवर माझे वजन पडत असावे.

ज्ञानसागरातील शिंपले
सद्धर्म प्रकाशन संग्रह

## अध्याय २ : सांख्ययोग

(मराठीत ओवीबद्ध भाषांतर)

अर्जुन विषादसांख्य योग निरुपण। क्षत्रिय कर्तव्याचे विवरण।।

स्थित प्रज्ञ लक्षणे निष्काम कर्माचरण। सांख्य योग दुसरा।।

**संजय सांगतो आहे :**

अंतरी करूणा अश्रुपूर्ण लोचन। मानसी खिन्न बने अर्जुन।। त्यास उपदेशी मधुसूदन। दुःखमुक्त करावया ।।१।।

**श्रीभगवान सांगतात:**

श्रेष्ठ पुरुषाला न शोभणारा। स्वर्गमार्ग रोखून अपकीर्ति करणारा।। हा मोह रणांगणी न चालणारा। अर्जुना आला कोठून।।२।।

सोडी दुर्बलता मनाची। टाकोनि देई भ्याडपणासी।। पराकाष्ठा करण्या पराक्रमाची। सज्ज होई युद्धाला।।३।।

**अर्जुनाची शंका :**

पार्थ विचारी मधुसूदना। योग्य असे ज्यांची वंदना।। ऐशा या भीष्मा द्रोणांना। बाण कैसे मारू मी? ।।४।।

महानुभाव गुरुजन मारण्याहून। श्रेयस्कर निर्वाह भिक्षा मागून।। कारण ऐश्वर्य जाईल माखून। वडिल जनांच्या रक्ताने ।।५।।

जिंकते कोण, कोण हरते। न कळे यातीलही चांगले कोणते।। न वाटे ज्याना मारावे ते। कौरव समोर आहेत।।६।।

भीतीने गांगरलो, धर्म विसरून। कृष्णासि विनवी शरणागत अर्जुन।। कल्याणकर सांगावे निश्चित करून। शिष्य असे मी तुझा।।७।।

पृथ्वीचे राज्य निर्वैर समृद्ध। स्वर्गाचेही अधिपत्य जरि होय साध्य।। परंतु इंद्रियशोषक शोकाविरुद्ध। काय करावे कळत नसे।।८।।

**संजय सांगतो आहे :**

संजय सांगे कौरवेशा। तेव्हा बोलोनि हृषीकेशा।। लढणार नाही ऐसी भाषा। स्वस्थ बैसे अर्जुन ।।९।।

उभय सैन्यांच्या समोर। अर्जुन सोडी आपुला धीर।। तेव्हा स्मितवदन करुणासागर। कृष्ण ऐसे बोलतसे ।। १०।।

**श्रीकृष्णांचा उपदेश :**

अयुक्त ठिकाणी शोक करिसी। वरती पांडित्याच्या बाता मारिसी।। जिवंत मृतांचा शोक मानसी। नसे पंडित जनांच्या ।।११।।

मी, तू आणि हे राजेही। भूतकाळी नव्हतो असे नाही।। भविष्यकाळी असणार नाही। हेही असत्य समजावे।।१२।।

बाल्य, तारुण्य, जरा या स्थिती। क्रमाने या शरीरास येती।। तैसी आत्म्यास अन्य देह प्राप्ती। ज्ञानवंता त्याचा मोह नसे।।१३।।

इंद्रिये सुखदुःख देती। भोगानंतर ती नष्ट होती।। जाणोनि त्यांची चक्रगती। सहन करी अर्जुना ।।१४।।

जे सुख दुःख सममानिती। ज्याना ही द्वंदे न पीडती।। तेचि मोक्षासी योग्य होती। पुरुष श्रेष्ठा अर्जुना ।।१५।।

जे नाही ते न उद्भवे। आहे ते नाश न पावे ।। केवळ तत्वज्ञ जाणती स्वभावे।

सत असत् चे हे गूढ ।।१६ ।।

आत्मतत्त्व असे अविनाशी । जे व्यापी सर्व विश्वासी ।। नष्ट करण्या आत्म्यासी । कोणीही नसे समर्थ ।।१७ ।।

नित्य अविनाशी अतर्क्य असून । आत्मा मानवदेह करी धारणा । मानवदेह नाशवंत जाणून । युद्ध करावे अर्जुना ।।१८ ।।

कोणी म्हणे हा दुसऱ्यांसि मारी । मेला म्हणती कोणीतरी ।। दोघेही न जाणती खरोखरी । तो न मारी मरत नसे ।।१९ ।।

सनातन आत्म्याला जन्म मृत्यु नाही ।। आहे वा होईल असेही नाही ।। अजन्मा तो नित्य शाश्वत राही । नष्ट न होई देहासवे ।।२० ।।

अक्षय, अविनाशी, अनादि, अनंत। ऐसे जो आत्म्यासि जाणत ।। तो कैसा कारण होत । कोणाच्याही मरणाला ।।२१ ।।

जीवात्मा जुने शरीर सोडून । प्रवेश करितो देहांत नूतन ।। जैसे जुनी वस्त्रे टाकून जन । धारण करिती नव्याना ।।२२ ।।

तुटत नसे हा शस्त्राने । जळत नसे हा अग्नीने ।। भिजत नसे हा पांण्याने । वायूने न होई कोरडा ।।२३ ।।

तुटत नसे आत्मा कधी । न जळे, न भिजे, न सुकेही ।। नित्य, सर्वव्यापी, स्थिर राही । अचल आणि सनातन ।।२४ ।।

इंद्रिये आणि मनासि अगम्य असे । तसाचि विकाररहित असे ।। जाणोनि आत्माचे स्वरुप ऐसे । त्याचा शोक न करावा ।।२५ ।।

आत्मा जन्म घेई नियमित । तैसाचि मृत्यू पावे नियत ।। ऐसी जरी तुझी समजूत । त्याचा शोक योग्य नव्हे ।।२६ ।।

जन्मला त्यास मृत्यू येई । फिरोनि त्याचा जन्म होई ।। अटळ ऐसे जाणोनि घेई । शोक न करी अर्जुना ।।२७ ।।

पंचभूतें अव्यक्त असती । अव्यक्तांत विलीन होती ।। देह मात्र दृष्य स्थिती । त्याचा शोक कशाला? ।।२८ ।।

कोणी आश्चर्याने पाहती । दुसरे आश्चर्याने वर्णन करिती ।। इतर कोणी आश्चर्याने ऐकती । कोणीही न जाणे तत्त्व याचे ।।२९ ।।

आत्मा सर्व देहीं वसे । त्यास मारणे शक्य नसे ।। म्हणोनि तुजला अयोग्य असे । शोक करणे सर्वथा ।।३० ।।

तुझ्या क्षात्र धर्माकारणे । योग्य नव्हे युद्धास भिणे ।। कारण धर्मयुद्ध करणे । सर्वोत्तम क्षत्रियांना ।।३१ ।।

क्षत्रियांना धर्मसंगर । उघडी जणु स्वर्गाचे दार ।। भाग्यानेच ऐसा अवसर । दैवयोगें लाभतसे ।।३२ ।।

धर्मयुद्ध हे जाणोनि जरी । तरीही तू युद्ध न करी ।। स्वधर्म, कीर्ती सांडोनि उपरी। धनी होशील पापांचा ।।३३ ।।

जरी तू युद्ध न करशील । लोक तुझी अपकीर्ती गातील ।। संभावितास जी वाटेल । मरणाहूनि दुःखदायी ।।३४ ।।

पळोनि गेला, वाटोनि भीती। मानतील सर्व रथी महारथी ।। आज तुला जे श्रेष्ठ समजती ।। पदोपदी चेष्टा करतील ।।३५ ।।

तुझे सामर्थ्य निंदतील । अपशब्दें तुज हिणवतील ।। शत्रूंचे ऐसे ऐकशील । याहून दुःखद काय असे? ।।३६ ।।

युद्धांत मरतां स्वर्ग मिळे। जिंकता पृथ्वीचे राज्य मिळे।। म्हणोनि कृतनिश्चयाचेनि बळे। उठ आता, कुंतिसुता।।३७।।

सुख, दु:ख, लाभ, हानि। जयपराजय सम मानी।। युद्ध करी निश्चय करोनि। पाप न लागे त्यामुळे।।३८।।

येणे सांख्य मार्ग जाण। यांत असे आत्मज्ञान।। आतां ऐक योग मार्ग ज्ञान। कर्मबंधन मुक्तिदायी।।३९।।

या धर्माचे अल्प आचरण। सोडवी मोठ्या भयापासून।। अंगीकृत कार्य होई सम्पन्न। विघ्न न येतां त्यामध्यें ।।४०।।

एकाग्र ज्यांची मनें नसती। त्यांच्या वासना अनंत असती।। म्हणोनि एकाग्र करी निश्चयबुद्धी। मर्म जाणोनि अर्जुना।।४१।।

जे केवळ वेदांची फलश्रुती। श्रेष्ठ समजून अन्य न मानिती।। ते मूढ इतरांना गर्वाने सांगती। कर्मकांडचि महत्वाचे।।४२।।

यज्ञादि कार्येच उत्तम मानिती। त्याने सर्व ऐश्वर्ये मिळती।। आणि लाभे स्वर्ग म्हणती। काम्यबुद्धी ते जाणावे।।४३।।

भोगांमागे धावे त्यांचे चित्त। म्हणोनि करण्या कार्य निश्चित।। कदापि त्यांची न होई स्थित। व्यवसाय बुद्धी ।।४४।।

त्रिगुणात्मक संसार वर्णिला वेदांनी। म्हणोनि गुणातीत, द्वंद्वातीत होऊन।। योगक्षेम दुर्लक्षून, सात्विक बनूनि। आत्मपरायण हो, अर्जुना।।४५।।

साधक ज्ञानसंपन्न होतां। काय वेदांची आवश्यकता।। सर्वत्र जलमय भूमी होतां। गरज नुरे विहिरीची।।४६।।

केवळ कर्माचरण तुझ्या हातांत। फलनिष्पत्ति नसे अधिकारांत।। म्हणून कर्मफलाशा नसावी मनांत। आग्रह नसावा टाळण्याचा।।४७।।

सोडूनि आसक्ती कर्मफलाची। धरी समबुद्धी यशापयशाची।। स्वकर्तव्य करी सव्यसाची। यालाच योग म्हणावे।।४८।।

श्रेष्ठ समबुद्धि योग आचरी। तुच्छ सकाम कर्मे न करी।। फलांशा धरूनि जो कर्मे करी। विकृत बुद्धी त्याची असे।।४९।।

समत्व बुद्धियोग साधला ज्याला। तो पापपुण्यांत न गुंतला।। कुशल योगी म्हणावे त्याला। जो आचरी हा योग।।५०।।

जे समत्व बुद्धीयोगी होती। स्वकर्मफल सोडोनि देती।। जन्म मरणातुनि ते मुक्त होती। सवेचि होती दु:खरहित।।५१।।

ऐकलेले वा नवे ऐकणे। दोन्ही होईल कंटाळवाणे।। बुद्धीची मोहमयी आवरणे। नष्ट होती ज्यावेळी।।५२।।

ऐकोनि वेदोक्त कर्मफल। तुझी बुद्धी होईल चंचल।। जेव्हा ती होईल अचल। होशील समत्व बुद्धियोगी।।५३।।

**अर्जनाचा प्रश्न :**

अर्जुन विचारी हृषीकेषा।। स्थितप्रज्ञ जाणावा कैसा।। बोले, राहे, वागे कैसा। समाधीमध्यें।।५४।।

**श्रीकृष्णाचे विवरण:**

श्रीकृष्ण अर्जुना सांगतसे। जो सर्व वासना सोडीतसे।। आत्मसंतुष्ट बनतसे। स्थितप्रज्ञ तया जाणावा।।५५।।

दुःखाने विषण्ण न होई मन। सुखविषयी उदासीन।। प्रेम, राग, भय गेले संपून। स्थितप्रज्ञ तया जाणावा।। ५६।।

जो सर्व विषयीं अनासक्त। सुखद वा दुःखद होता प्राप्त।। हर्ष शोकाने न होई व्याप्त। स्थितप्रज्ञ तया जाणावा।।५७।।

इंद्रियाना संपूर्णपणे आवरोन। विषयांपासून धरी जो रोखून।। जैसे संकटकाळी कासवाचे आचरण। स्थितप्रज्ञ तया जाणावा।।५८।।

इंद्रियें विषयांपासून अलिप्त करून। विषय सुटती, आसक्ति राहोन।। परंतु ईश्वराचे होतां दर्शन। वासनाही शांत होती।।५९।।

पुरुष असतां ज्ञानी समर्थ। प्रयत्न करी आनंद प्राप्त्यर्थ।। परंतु इंद्रियें त्याहूनि समर्थ। मनासि नेती भलतीकडे।।६०।।

इंद्रियांचा पराभव करून। माझे ठायी ठेवी मन।। ज्याची इंद्रियें स्वाधीन। स्थितप्रज्ञ तया जाणावा।। ६१।।

अंतरी सतत विषयांचे चिंतन। त्यांचीच आसक्ति करी उत्पन्न।। इच्छा उपजती आसक्तितून। इच्छानिरोधें क्रोध।।६२।।

क्रोधाने सुटे विवेक। अविवेक विस्मरणकारक।। विस्मरण बुद्धिनाशक। जेणे नाश सर्वस्वाचा।।६३।।

राहोनि पूर्ण भावनातील। ठेवोनि मनासि ताब्यात।। होई सहभागी सर्व विषयांत। समाधान लाभे तया।।६४।।

समाधानी होता अंतर। दुःखांचा होई परिहार।। प्रसन्न होतां अभ्यंतर। बुद्धि स्थिर होतसे।।६५।।

श्रद्धा भक्ति विहीनांना। नसते बुद्धि, सात्विक भावना।। शांति न लाभे अशा पुरुषांना। सुख कोठून मिळणार?।।६६।।

इंद्रियें धावती भोगांमागे। मन धावे इंद्रियांमागे।। सवे नेते बुद्धि कुमार्गे। जळीं नौकेस वायू जैसा।।६७।।

म्हणोनि हे धनंजया। जो आवरी सकल इंद्रियां।। विषयांपासोनि ज्यांच्या त्यांच्या। स्थितप्रज्ञ तया जाणावा।।६८।।

जेव्हा प्राणिमात्र विसावती। ज्ञानी मुनी जागृत असती।। आराम ते केव्हा करिती? कार्यवेळीं इतरांच्या।।६९।।

सागराची मर्यादा न ढळे। जरी नद्यांचे जल त्यास मिळे।। शांति लाभे जो भोगांनी न चळे। अशांत राही लालसी।।७०।।

सकल इच्छा त्यागून। मी, माझे हे दंभ सोडून।। जो करी कर्तव्य पालन। मन:शांति लाभे तया।।७१।।

हीच जाण ब्राह्मी स्थिती। जेथे मोह पाश न उरती।। होई ब्रह्मानंदाची प्राप्ती। आणि अंती मोक्षपद ।।७२।।

घालवण्या अर्जुनाची भीती। भगवंत त्याला उपदेश करिती।। क्षत्रिय कर्तव्यांचे वर्णन करिती। बोलती त्याला टोचून।। परी हेही अपुरे पडले। म्हणून ब्रह्मज्ञान सांगितले।। स्थितप्रज्ञाचे वर्णन केले। सांख्ययोग अध्याय समाप्त।।

।।श्रीकृष्णार्पणमस्तु।।

**श्री. वा. प. पटवर्धन**
द्वारा सौ. जया धनपाल शहा,
ए १/११ श्री महावीर नगर,
आयकॉन हास्पिटल समोर, मानपाडा,
डोंबिवली पूर्व ४२१२०१

●●●

**आदौ देवकिदेविगर्भजननं गोपी गृहे वर्धनम्। माया पूतन जीवितापहरणं गोवर्धनोद्धारणम्। कंसच्छेदन कौरवादि हननं कुतीसुतानामवनम्। एतभ्दागवतं पुराण कथितं श्रीकृष्ण लीलामृतम्।**

(हा श्लोक 'सद्धर्म' चे एक सभासद श्री. डी. एस. प्रभू. गोरेगाव, यानी पाठविला आहे.)

**अर्थ :**

प्रथम देवकी देवीच्या गर्भात जन्म घेणे, (नंतर) गोपीच्या (यशोदेच्या) घरी लहानाचा मोठा होणे, मायावी पूतना राक्षसीच्या जीवाचे हरण करणे, (म्हणजे तिला ठार मारणे). गोवर्धन पर्वत उचलून गवळ्यांचा उद्धार करणे, कंस व कौरव याना ठार मारणे, कुंतीचे मुलगे पांडव यांचे रक्षण करणे हेच (काय ते) श्रीकृष्णलीला अमृत भागवत पुराणात सांगितले आहे.

**शब्दार्थ :**

आदौ (अव्यय) प्रथम. जननम् - जन्म वर्धनम् - वाढणे. जीवितापहरण हा समास आहे, जीवितस्य अपहरण षष्ठी तत्पुरुष उद्धरणम् - उद्+हृ-हर १ प.प. पासून बनलेले नाम उद्धार.

**संधी :**

कंसच्छेदन-ऱ्हस्व स्वरापुढे छ आघ्यामुळे त्याला च हा आगम झाला. पाणिनी सूत्र छे च। अष्टाध्यायी अध्याय ६वा, पाद १ला, सूत्र ७१ वे.

कंसस्य छेदनम्-असा षष्टी तत्पुरुष समास होतो हनन-हन् २ प.प. पासून बनलेले नाम. ठार मारणे अवनम् - अव १ परस्मै रक्षण करणे यापासून बनलेले नाम. कथितम् - कथ् १० उ. प. कर्मणि भूतकाल वाचक धातुसाधित विशेषण न पु. प्र. द्वि. ए. व. सांगितलेले आहे.

श्रीकृष्णलीलामृतम् : हा समास आहे श्रीकृष्णस्यलीला श्रीकृष्णलीला षष्ठीतत्पुरुष समास. । श्रीकृष्णस्यलीला एव अमृतम् श्रीकृष्णलीलामृतम्, अवधारणा पूर्वपद कर्मधारय समास. श्रीकृष्णाच्या लीला हेच अमृत (रूपक कर्मधारय) (या श्लोकाचे अर्थ व व्याकरण लेखक)

**श्री. दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३ विठ्ठल मंदिराजवळ,
मु. पो. मुद्रेखुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड ४१० २०१.
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

•••

**अमृतवाणी**

**श्रीसदगुरु -**

१) गुरुत्व म्हणजे आपल्या समोरच्या माणसाच्या उत्कर्षाची सतत चिंता वाहणे, काळजी करणे. जे अशी काळजी करतात ते सदगुरु

२) गुरु करणे म्हणजे आपणहून आपणास जाब विचारणारा मनुष्य मान्य करणे होय.

- प. पू. पारनेरकर महाराज

(लेखांक - १) मृत्युंजय मानसपूजा

आद्य शंकराचार्यांनी इ. स. च्या ८व्या शतकात अस्तंगत होत जाणाऱ्या वैदिक सनातन धर्माचे पुनरुत्थान केले. या प्रक्रियेत वैदिक धर्मातील उदात्त तत्त्वे सात्त्विक व सोप्या स्वरूपात मांडून ती लोकप्रिय करणे आवश्यक होते. वैदिक धर्म आणि तत्त्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचण्याची नितांत गरज होती. धर्म लोकभिमुख करण्याचा सोपा मार्ग म्हणजे भक्तीचा. भक्ती म्हटलं की आपल्या मनश्चक्षुसमोर उभा रहातो तो ईश्वराची मनोभावे पूजा करणारा भक्त ईश्वराप्रती भक्ती व्यक्त करण्याचा एक प्रकार म्हणजे पूजा वस्तुत: भक्तीभाव व्यक्त करण्याचे वंदन, कीर्तन, भजन इ. विविध मार्ग आहेत. पण ईश्वरभक्तीचा सर्वांत लोकप्रिय, घराघरांत, मंदिरात दररोज आचरला जाणारा मार्ग म्हणजे पूजा. पूजेमध्ये वेगवेगळे विधी असतात. पूजा करायची विशिष्ट पद्धत असते. आचार्यांनी आपल्या स्तोत्रांमध्ये सर्वसामान्यांना सहज समजेल अशा शब्दांत पूजेचे वर्णन केले आहे. पूजांचे विविध प्रकार सांगितले आहेत. हे प्रकार, तत्त्वज्ञानाच्या मार्गावरून वाटचाल करणाऱ्या भक्ताची उत्तरोत्तर प्रगती साधणारे आणि एकापेक्षा एक असे प्रभावी आहेत. भौतिक बाह्य पूजा, मानसपूजा, परापूजा अशा या पूजांची मिळणारी फळे ही ज्येष्ठताक्रमाने आधिकाधिक श्रेष्ठ, अगदी मोक्ष प्राप्त करून देणारी आहेत.

खरंतर या पूजा गद्यात किंवा प्रवचनरूपातही सांगता आल्या असत्या पण त्या स्तोत्राव्दारे सांगण्यामागे आचार्यांचा विशेष हेतू असावा असे दिसते. एखादा विचार भक्ताच्या मनबुद्धीपर्यंत पोहोचवण्याचे स्तोत्र हे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. स्तोत्र सुगम रसाळ व गेय असल्याने कंटाळवाणे होत नाही. प्रत्यक्ष पूजा करताना अर्थाकडे लक्ष देऊन ही स्तोत्रे म्हटली तर लक्ष ईश्वराकडे सहज केंद्रित होते. विचलित होत नाही. पूजेतील कोणताही उपचार करण्याचा विसर पडत नाही, व मनात भक्तिभावही जागृत होतो. शिवमानसपूजा, परापूजा इ. आचार्यांनी रचलेली पूजा - स्तोत्रे नित्यपठनीय आहेत. ती अतिशय मधुर व अर्थवाही आहेत.

वस्तुत: आचार्य हे तत्त्वज्ञ, व त्यातही ज्ञानमार्गी. 'ज्ञानान्मोक्ष: (ज्ञानानेच मोक्ष प्राप्त होतो) हा आचार्यांच्या केवलाद्वैत तत्त्वज्ञानाचे सार असणारा सिद्धान्त आचार्यांनी आपल्या सर्वप्रकारच्या वाङमयांतून स्पष्ट केला आहे. अगदी भक्तिमार्गाचा विशेष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्तोत्रांतूनही आणि म्हणून देवतांच्या केवळ बाह्य पूजेचे वर्णन करून आचार्य थांबत नाहीत तर मानसपूजा व मोक्षदायिनी परापूजेच्या माध्यमातून ते भक्ताला भक्तिज्ञानाच्या सोपानावरून मोक्षाकडे नेतात.

पूजेतील विविध उपचारांचे वर्णन करणाऱ्या पूजास्तोत्रांपैकी शिवमानसपूजा, श्रीराममानसपूजा, मृत्युंजयमानसपुजा, परापूजा ही स्तोत्रे होत या स्तोत्रांपैकी 'मृत्युंजयमानसपूजा' या स्तोत्रात पूजेचे सविस्तर, साद्यन्त वर्णन केले आहे. मृत्युंजय शंकर 'मृत्युं जयाति स मृत्युंजय। मृत्यूला जिंकतो तो मृत्युंजय हे सर्व जग काळ अथवा मृत्यूच्या बंधनात जखडलेले आहे. मृत्युपुढे भल्याभल्याचीही मात्रा चालत नाही पण शंकराने मृत्यूला जिंकले आणि म्हणूनच तो मृत्युंजय होय. अपमृत्यूवर मात करता येणे हे

या स्तोत्राचे फळ आहे. या स्तोत्रात मृत्युंजयाच्या मानसपूजेचे वर्णन आहे. मानसपूजा म्हणजे नावाप्रमाणेच भक्तियुक्त अत:करणाने मनातल्या मनात ईश्वराची केलेली पूजा 'मृत्युंजयमानसपूजा'

वस्तुत: पूजाविधी व पूजोपचारांच्या दृष्टीने भौतिक - बाह्यपूजा व मानसपूजा यांत भिन्नता नाही पण बाह्यपूजा हे शारीरिक कर्म आहे. बाह्यपूजेत जे उपचार असतात तेच मानसपूजेत मनाने केले जातात म्हणजे मानसपूजा हे मानसिक कर्म आहे. मानसिक कर्म हे शारीरिक कर्मापेक्षा आधिक सूक्ष्म असते आणि म्हणूनच ते आधिक प्रभावी शक्तिशाली असते शरीरपूजा फलदायी असते पण मानसपूजा आधिक व सत्वर फल देणारी व प्रभावी असते. बाह्य पूजोपचार व सामग्रीपेक्षा मनातील भक्तिभावाला आधिक महत्त्व असते हे भगवद्गीतेत सांगितले आहेच पण देव भावाचा भुकेला असा सिद्धांत सर्व संतमहात्म्यांनी सांगितला आहे. अगदी व्यावहारिक दृष्टीने विचार केला तरी, साग्रसंगीत बाह्यपूजेसाठी लागणाऱ्या सामग्रीची जमवाजमव ही कष्टाची व खर्चिक बाब आहे. पण या सर्वांची आवश्यकता मानसपूजेत नाही. मनात शिगोशिग भरलेला भक्तिभाव, ईश्वरावर पूर्ण श्रद्धा व मनाची एकाग्रता हीच काय ती मानसपूजेची सामग्री. अशा मानसपूजेला स्थळकाळाचीही मर्यादा नाही. ही कुठेही, कधीही करावी. तर अश्या ह्या मृत्युंजयमानसपूजेचे वर्णन करणाऱ्या स्तोत्रात एकूण ४६ श्लोक आहेत. त्यापैकी पहिल्या ४४ श्लोकांत, शास्त्रांत सांगितलेल्या पूजेतील एकूण ४४ उपचारांचे वर्णन फार रसाळ व सोप्या भाषेत सविस्तर केले आहे. प्रत्येकी एका श्लोकात एक विधी याप्रमाणे वर्णन केलेले पूजोपचार पुढीलप्रमाणे ध्यान, आवाहन आसन, पाद्य, अर्ध्य, आचमन, मधुपर्क, पंचामृत, शुद्धोदक, मार्जन, वस्त्र यज्ञोपवीत, गंध, अक्षता, पुष्प, पादुका, अलंकार, चामर, छत्र, आदर्श, धूप, दीप, नैवेद्याचे १२ उपचार, (यामध्ये विविध भाज्या, भात, रायते, सुगंधी जल, पक्वान्ने खिरी, विविध पेये, फळे चटणी लोणच्यासारखे मसालेदार चविष्ट पदार्थ, दही, मध इ. अनेक पदार्थांचा उल्लेख आहे) हस्तमुखपादप्रक्षालन, पुनराचमन, तांबूल, आरती, पाद्यार्ध्य, मंत्रपुष्प, प्रदक्षिणा, नमस्कार, प्रार्थना, शयन. या स्तोत्रातील नैवेद्याचे वर्णन फार बहारदार आहे. नैवेद्याच्या केवळ शाद्बिक वर्णनावरूनच त्याच्या चविष्टपणाची कल्पना यावी इतके अस्सल आहे. आठव्या शतकात प्रचलित असलेल्या खाद्यपदार्थांची, तसेच विविध भाज्या, फळे, फुले मसाल्यांचे पदार्थ यांची संस्कृत नावे अभ्यासकासाठी उपयुक्त आहेत. या संपूर्ण स्तोत्रात ईश्वराच्या पूजेसाठी जगातील सर्वोत्कृष्ट सामग्री कल्पिणारा भक्त खरोखरच उदारचित्त आणि ईश्वरमय झाला असला पाहिजे. हा भक्त म्हणजे खुद्द आचार्य शंकरच ज्ञानमार्गी तत्त्वज्ञ असूनही आचार्यांच्या सात्त्विक अंत:करणात भक्तीचा झरा अव्याहत वहात होता याची खूण म्हणजे हे स्त्रोत्र.

पूजोपचाराच्या वर्णनानंतर अखेरच्या दोन श्लोकांत आचार्यांनी फलश्रुती सांगितली आहे. आचार्य म्हणतात.

**'चतुश्चत्वारिंशद्विलसदुपचारैरभिमतै**
**र्मन:पद्मे भक्त्या बहिरपि च पूजां शुभकरीम्।**
**करोति प्रत्यूषे निशि दिवसमध्येऽपि च पुमान्**
**प्रयाति श्रीमृत्युंजय - पद्मनेकाद् भुतपदम्।।**

(पृष्ठ ३२ वर)

(मुख पृष्ठावरून)

**संपादकीय**

वस्त्रहरण झाले. या भ्रष्टाचार विरोधी चळवळीला त्यांनी मागे तर नेलेच, पण लोकांचीही दिशाभूल झाली. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, भारतीय 'अध्यात्मा'सारख्या गंभीर विषयाची फसवणूक झाली.

श्री सत्य साईबाबा यांचेही लाखो अनुयायी आहेत. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या आश्रमातून मिळालेल्या संपत्तीने पुन्हा एकदा या अध्यात्म्याला हास्यस्पद करून टाकले. शेकडो लेख वा हजारो तास जरी त्यांच्या अनुयायांनी तर्काच्या कोलांट्या घेत या गोष्टींचे समर्थन केले, तरी 'अध्यात्म' संकल्पनांची झालेली हानी भरून निघणार नाही. भारतातल्या सध्याच्या भ्रष्टाचारापेक्षा, एका 'शाश्वत' विचाराचे झालेले हे अवमूल्यन, ही हानी जास्त क्लेशकारक आहे.

धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ आपल्या संस्कृतीत सांगितले आहेत. त्यात कोणीही श्रेष्ठ, कनिष्ठ नसून त्यांचे 'संतुलन' अपेक्षित आहे. 'अर्थ' आणि 'काम' या संकल्पनांचा पुरुषार्थांमधील अंतर्भाव, हा भारतीय संस्कृतीला असलेल्या वास्तवाची जाण आहे. राग, लोभ मत्सर, चांचल्य इ. मानवी मनाच्या गुणांची 'समज' भारतीय संस्कृतीइतकी चांगली इतर संस्कृतींमध्ये क्वचितच दिसून येते. जन्माच्या आधीपासून ते मृत्यूपर्यंतच्या संस्कारांचे महत्त्वही म्हणूनच समजून घ्यावे लागते. चार वर्ण, चार आश्रम यांची रचनाही माणसाच्या 'शारीरिक' व 'मानसिक' रचनांवरच आधारित आहे. अगदी जन्मापासून संस्कारित करण्याचा यामध्ये प्रयत्न आहे. वैयक्तिक किंवा सामाजिक नीतिमूल्ये रुजू करण्याच्या प्रक्रियेतील ती एक योजना आहे. सगळी नीतिमूल्ये ही वय, लिंग व सामाजिक परिस्थिती सापेक्ष आहेत. त्यांत विवेक आणण्याचे काम शिक्षण करते. शाळेबरोबरच घरादारात मिळणाऱ्या शिक्षणाचा यात अंतर्भाव आहे.

याच सर्व संकल्पनांचे, विचार परंपरांचे झालेले 'अवमूल्यन' ही भारतापुढची आज खरी समस्या आहे. राजकारणी आणि समाजकारणी जेवढे भ्रष्ट होऊ शकतात, तेवढेच लोकायुक्त व लोकपालही भ्रष्ट होऊ शकतील. आज आपण कायद्याचे जंगल निर्माण करून ठेवले आहे; आणि तरीही गुन्हेगारी दिवसे न् दिवस वाढतेच आहे. नवीन कायदे किंवा संस्था हा यावरील उपाय नाही. मूल्यहीन समाज, भविष्यात निर्माण होणाऱ्या सगळ्या संस्था 'भ्रष्ट' करू शकतो. याला अध्यात्मही अपवाद नाही. आणि म्हणूनच यावर उपाय म्हणजे 'नवीन' कायदे किंवा 'लोकपाल' हा नसून, नीतिमूल्ये व पर्यायाने 'चारित्र्या'चे संवर्धन हा आहे. याकरीता लागणारी सगळी साधने व साहित्य आपल्या धर्मात उपलब्ध आहेत. प्रश्न एवढाच आहे की, आपण हे लक्षात घेणार आहोत का? तसे होणार नसेल तर नावे बदलून, संस्था काढून किंवा नवीन आध्यात्मिक गुरू आणि राजकारण्यांच्या प्रवेशानीही ही समस्या सुटणारी नाही. गुरुची निवड काय किंवा लोकप्रतिनिधींची पसंती काय या सर्व गोष्टी लोकशाहीत आपल्याच निर्णयामुळे होत असतात. मूल्यहीन आणि भ्रष्ट समाजाचे 'अध्यात्म' आणि 'नेतृत्व' हे त्या समाजाचेच 'प्रतिबिंब' असते. आरसा खोटा नसतो. म्हणूनच नवीन कायदे किंवा नेतृत्व बदलाने या समस्या सुटणाऱ्या नाहीत. बदलाची सुरवात आपल्या पासुनच करावी लागेल. याला गरज आहे ती किमान प्रामाणिकपणाची. पण हे लक्षात कोण घेणार?

●●●

(पृष्ठ ३० वरून)

शास्त्रसंमत अशा ४४ पूजेच्या उपचारांनी, भक्तिभावाने जो कोणी आपल्या अंत:करणकमलात पूजा करेल म्हणजे मानसिक पूजा करेल अथवा यथाशक्ती बाह्यपूजा करेल त्याच्यासाठी पूजा कल्याणदायीनी व मंगलकारक होईल. सकाळ, मध्यान्ह व सायंकाळ अशी त्रिकालपूजा करणारा मृत्युंजयाच्या अवर्णनीय पदाला पोहोचेल पुढे आचार्य म्हणतात शिवदर्शनाचा महिमा असा की सकाळ, मध्यान्ह व सायंकाळी शिवदर्शन घेणाऱ्यास व प्रदोघकाळी म्हणजे सूर्यास्ताच्या वेळी ॐ नम: शिवाय या पंचाक्षरमंत्राचा जप करणाऱ्याला उच्चफल (मोक्ष) प्राप्त होईल. काव्य, तत्त्वज्ञान व पूजेचे ज्ञान या सर्व दृष्टीने उत्कृष्ट असलेले स्तोत्र विस्तार भयास्तव येथे मूळातून दिलेले नसेल तरी वाचकांनी ते मूळातून वाचून त्याचा आनंद घ्यावा.

**डॉ. सौ. वैशाली ज. दाबके**
B – 302 मित्तलपार्क को. ऑ.
हाउसिग सोसायटी, रघुनाथ
नगर – ठाणे ४०० ६०४
दूरध्वनी – २५८२६६५८
भ्रमणध्वनी – ९८२१४९२७५३

●●●

## सद्धर्म त्रैमासिकासाठी लेख

समाजातील नीतिमत्ता वाढावी, चांगल्या विचारांचा प्रसार व्हावा, जनमानसांवर उत्तम संस्कार घडावेत, भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी, या दृष्टी कोणातून सद्धर्म त्रैमासिक गेली ४५ वर्षे नियमित प्रकाशित होत आहे, व याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्रात अभ्यासू व विचारवंत लेखक बरेच आहेत. आमच्या उपक्रमाला त्यांची मदत व्हावी म्हणून त्यानी लेख पाठवावेत अशी विनंती करीत आहोत. 'सद्धर्म' च्या सभासदानी यात सहभागी व्हावे व त्यांच्या परिचित मंडळीना लेख पाठविण्यास आमच्या तर्फे विनंती करावी. अंक ३२ पाने आहेत. लेख १००० ते १२०० शब्दांपर्यत असावा व तो सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावा. लेखकाला प्रत्येक छापलेल्या लेखाला ३०० रुपये मानधन देण्यांत येईल. लेख स्वीकारण्याचा अधिकार संपादकाना आहे. न छापलेला लेख परत पाठविण्यांत येणार नाही.

विश्वस्त,
सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट.

**संपादकीय :** डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक :** अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे – ४०० ६०१.
**मुद्रण स्थळ :** परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१.